## सुविचार

विचारांची दिशा बदला, कारण विचारच आयुष्याला वळण देतात. नकारात्मकतेत अडकलेला मनाचा प्रवास थांबवा आणि सकारात्मकतेकडे पाऊल टाका. जशी दृष्टी बदलते, तशी संधी दिसू लागते.

# दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...

■ आरएनआय : MAHMAR/2021/85884 रविवार, दि. ०१ फेब्रुवारी, २०२६ ■ वर्ष - १ ■ अंक - १२९ ■ पाने - ४ पुणे/पिंपरी-चिंचवड

### आज मांडला जाणार अर्थसंकल्प

**मुंबई :** देशाच्या इतिहासात प्रथमच १ फेब्रुवारी रोजी, अर्थात आज रविवारी 11 वाजता अर्थसंकल्प सादर होणार असून अर्थमंत्री निर्मला सीतारामन संसदेत अर्थसंकल्प मांडतील. यंदाच्या अर्थसंकल्पाकडे शेतकऱ्यांचे विशेष लक्ष लागले आहे. २०१३-१४ मध्ये २१,९३३ कोटी असलेले कृषी बजेट आता १.२७ लाख कोटींच्या पुढे गेले आहे. तज्ज्ञांच्या मते, २०२६ मध्ये कृषी बजेट १.५ लाख कोटींपर्यंत वाढण्याची शक्यता असून पीएम-किसान, पीक विमा व सिंचन योजनांसाठी अधिक निधी दिला जाऊ शकतो.

## सारांश वृत्त

### सिम्स पार्कमध्ये फुलांच्या रोपांची लागवड

**उधगमंडलम (तामिळनाडू) :** येथील प्रसिद्ध सिम्स पार्कमध्ये शनिवारी ५० जातींच्या ४.५ लाखांहून अधिक फुलांच्या रोपांची लागवड सुरू झाली, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. उद्यान विभाग दरवर्षी येणाऱ्या उन्हाळी हंगामाच्या तयारीसाठी वार्षिक लागवड प्रक्रिया सुरू करतो, ज्या दरम्यान हिल स्टेशन मोठ्या संख्येने पर्यटकांना आकर्षित करते. १२ हेक्टरमध्ये पसरलेले सिम्स पार्क, जमिनीच्या नैसर्गिक आराखड्याच्या आसपास शतकाहून अधिक काळापूर्वी विकसित करण्यात आले होते. उद्यानातील वनस्पति उद्यानाची स्थापना पद्धतशीर आणि आर्थिकदृष्ट्या महत्त्वाच्या विविध विदेशी वनस्पती प्रजातींचा परिचय करून देण्यासाठी आणि त्यांची चाचणी घेण्यासाठी करण्यात आली होती.

### केरळला दिलेली आश्वासने पूर्ण करावीत

**तिरुवनंतपुरम :** काँग्रेस खासदार शशी थरूर यांनी शनिवारी सांगितले की, केंद्र सरकार केरळला दिलेले आश्वासने पूर्ण करेल, ज्यामध्ये केंद्रीय अर्थसंकल्पात एम्सची स्थापना समाविष्ट आहे, अशी आशा आहे आणि किनारपट्टीवरील धूप "युद्धपातळीवर" हाताळण्याची गरज आहे यावर भर दिला. थरूर म्हणाले की, चीनसारख्या परकीय देशाला एक इंचही जमीन गमावल्याने "युद्ध" आणि "राष्ट्रीय सुरक्षेला धोका" यावर चर्चा सुरू होत असताना, समुद्रामुळे होणाऱ्या किनारी भागांच्या मोठ्या प्रमाणात होणाऱ्या धूपाकडे - ज्याला "भारत माता" चे भाग म्हणून संबोधले जाते - तितकेच लक्ष दिले जात नाही. त्यांनी सांगितले की ते गेल्या अनेक वर्षांपासून संसदेत आणि पंतप्रधानांसमवेत किनारपट्टीच्या धूपाचा मुद्दा उपस्थित करत आहेत.

## महाराष्ट्राला पहिली महिला उपमुख्यमंत्री; पंतप्रधान मोदींकडून शुभेच्छा

# सुनेत्रा पवार यांचा शपथविधी साधेपणात पार

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई:** दिवंगत अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी आज (दि. ३१) सायंकाळी महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी लोकभवन येथे झालेल्या शपथविधीत त्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. शनिवारी सायंकाळी पार पडलेला हा शपथविधी अत्यंत साध्या आणि शांत वातावरणात झाला. अजित पवार यांच्या निधनाच्या पार्श्वभूमीवर या कार्यक्रमाला दु:खाची झालर होती. त्यामुळे कोणताही जल्लोष न करता, शासकीय संकेत पाळत शपथविधी पार पडला. शपथविधीपूर्वी लोकभवनकडे येणाऱ्या समर्थकांना फुले, हार किंवा पुष्पगुच्छ न आणण्याच्या स्पष्ट सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार कार्यकर्ते आणि उपस्थितांनी संयम पाळत कार्यक्रमात सहभाग घेतला. कोणत्याही घोषणा, जल्लोष किंवा उत्सवी वातावरणाविना शपथविधी पार पडल्याने संपूर्ण कार्यक्रमात गांभीर्य जाणवत होते. लोकभवन येथे झालेल्या या कार्यक्रमाला मुख्यमंत्री, मंत्रिमंडळातील सदस्य, वरिष्ठ अधिकारी आणि निवडक नेते उपस्थित होते. शपथविधीनंतर सुनेत्रा पवार यांनी कोणतेही भाषण न करता थेट औपचारिक प्रक्रिया पूर्ण केली. सुनेत्रा पवार या शुक्रवारी रात्रीच बारामतीतून मुंबईकडे रवाना झाल्या होत्या. आज सकाळपासून मुंबईत राजकीय घडामोडींना वेग आल्याचे पाहायला मिळाले होते. सुनेत्रा पवारयांची विधिमंडळ पक्षनेतेपदी निवड करण्यात आली. राष्ट्रवादीची गटनेतेपदाची महत्त्वपूर्ण बैठक विधीमंडळात पार पडली. यावेळी दिलीप वळसे पाटलांकडून गटनेतेपदाचा प्रस्ताव मांडण्यात आला. हा प्रस्ताव एकमताने मंजूर करण्यात आला. छगन भुजबळ यांच्याकडून सुनेत्रा पवार यांच्या नावाला अनुमोदन देण्यात आले. यानंतर सुनेत्रा पवार यांची एकमताने गटनेतेपदी निवड करण्यात आली. यानंतर धनंजय मुंडे, छगन भुजबळ, प्रफुल पटेल, सुनील तटकरे, संजय बनसोडे, सुनील तटकरे हे मुख्यमंत्र्यांच्या भेटीसाठी वर्षा बंगल्यावर रवाना झाले. मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन राष्ट्रवादीच्या नेत्यांनी गटनेते म्हणून सुनित्रा पवार यांची निवड झाल्याचे पत्र दिले. यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून ते पत्र राज्यपालांना पाठवण्यात आले. त्यानुसार, शपथविधी सोहळा संध्याकाळी ५ वाजता पार पडला. मर्यादित लोकांना शपथविधीसाठी उपस्थित राहण्याची परवानगी देण्यात आली होती. शपथविधी सोहळा अवघ्या १० मिनिटांत अत्यंत साधेपणाने पार पडला. यावेळी सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. सुनेत्रा पवार या महाराष्ट्रातील पहिल्या महिला उपमुख्यमंत्री ठरल्या आहेत. मात्र हा ऐतिहासिक क्षण आनंदापेक्षा शोकाच्या वातावरणात घडल्याने राजकीय वर्तुळातही या प्रसंगाकडे संवेदनशीलतेने पाहिले जात आहे. दिवंगत अजित पवार यांच्या निधनानंतर निर्माण झालेल्या राजकीय पोकळीच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे. आगामी काळात सुनेत्रा पवार यांच्यावर मोठी जबाबदारी असणार असून, प्रशासन आणि राजकीय समन्वयाच्या पातळीवर त्यांची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. अजित पवार यांच्या आकस्मिक निधनानंतर पवार कुटुंबावर मोठा आघात झाला आहे. त्यांच्या दोन्ही मुलांचा राजकारणातील अनुभव मर्यादित असल्याने पुढील काळात पक्षाची जबाबदारी कोण सांभाळणार, हा प्रश्न निर्माण झाला होता. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसने सुनेत्रा पवार यांच्याकडे नेतृत्व सोपवण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी त्यांना उपमुख्यमंत्रीपद स्वीकारण्यास राजी करण्यात आले, अशी माहिती पक्षातील सूत्रांकडून देण्यात आली. सुनेत्रा पवार या बारामती मतदारसंघात आणि पवार कुटुंबाशी संबंधित विविध संस्थांमध्ये सक्रिय राहिल्या आहेत. त्या राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी मंत्री डॉ. पद्मसिंह पाटील यांच्या भगिनी आहेत. पक्ष संघटन, कुटुंबीय जबाबदाऱ्या आणि सामाजिक कामाचा अनुभव त्यांच्या पाठीशी असल्याचे मानले जाते.

### सुनेत्रा पवार यांच्याकडे चार महत्त्वाची खाती

● महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे कोणती खाती देण्यात आली आहेत, याबाबतचा अधिकृत निर्णय जाहीर करण्यात आला आहे. त्यानुसार सुनेत्रा पवार यांच्याकडे राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास आणि औकाफ ही चार खाती सोपवण्यात आली आहेत.

## धाराशिवची लेक पहिली महिला उपमुख्यमंत्री

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**धाराशिव :** जिल्ह्याचे नाव डॉ. पद्मसिंह पाटील यांच्या रूपाने अनेकदा मुख्यमंत्रीपदाच्या चर्चेत आले. मात्र नशिबाची साथ न मिळाल्याने ती संधी प्रत्यक्षात साकारू शकली नाही. आता मात्र उपमुख्यमंत्रीपदावर जिल्ह्याची लेक विराजमान झाल्याने मुख्यमंत्रीपद हुकल्याची हुरहुर काहीशी भरून निघाल्याची भावना जिल्ह्यातून व्यक्त होत आहे. डॉ. पद्मसिंह पाटील यांच्या भगिनी आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रमुख नेत्या सुनेत्रा अजित पवार यांची उपमुख्यमंत्रीपदी निवड झाल्याने धाराशिव जिल्ह्यात आनंदाचे वातावरण आहे. या निमित्ताने विकासकामांच्या बाबतीत 'माहेर' असलेल्या जिल्ह्याला झुकते माप मिळेल, अशी अपेक्षा सामान्य नागरिकांमधून व्यक्त केली जात आहे. तेर हे सुनेत्रा पवार यांचे माहेर असून डॉ. पद्मसिंह पाटील हे त्यांचे ज्येष्ठ बंधू आहेत. उपमुख्यमंत्री म्हणून सुनेत्रा पवार यांची निवड झाल्याने या भागाला राजकीयदृष्ट्या नवे महत्त्व प्राप्त झाले आहे. गृहिणी ते उपमुख्यमंत्री असा त्यांचा प्रवास चर्चेचा विषय ठरत असून, अजित पवार यांच्याप्रमाणेच त्या उत्तम प्रशासक ठरतील, असा विश्वास पक्षातील नेते आणि कार्यकर्त्यांकडून व्यक्त केला जात आहे. अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर निर्माण झालेल्या राजकीय परिस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेसने त्यांच्या जागी पत्नी सुनेत्रा पवार यांची निवड केली. शरद पवार मुख्यमंत्री असताना डॉ. पद्मसिंह पाटील हे सातत्याने मंत्रिमंडळात होते. या दोन्ही ज्येष्ठ नेत्यांमधील घट्ट मैत्रीतूनच अजित पवार आणि सुनेत्रा पवार यांचा संसार आकाराला आला, असे राजकीय वर्तुळात सांगितले जाते.

## भाजप सत्तेत येताच भ्रष्टाचाऱ्यांना तुरुंगात पाठवू

# कोलकात्यात अमित शहांचा तृणमूलवर हल्ला

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**कोलकाता :** पश्चिम बंगालमध्ये सत्ताधारी तृणमूल काँग्रेसवर जोरदार टीका करत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी शनिवारी भाजप सत्तेवर येताच भ्रष्टाचारात गुंतलेल्या लोकांना एकामागोमाग तुरुंगात पाठवले जाईल, असा दावा केला. बंगालमध्ये भाजपचे सरकार पूर्ण बहुमताने स्थापन होईल आणि आगामी निवडणुकीत पक्षाची मतांची टक्केवारी ५० च्या पुढे जाईल, असेही त्यांनी सांगितले. आपल्या भाषणात शहा यांनी मागील निवडणुकांचे आकडे मांडले. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपला ३९ टक्के मते मिळाली होती, तर २०२१ च्या विधानसभा निवडणुकीत ३८ टक्के मतांसह पक्षाने ७७ जागा जिंकल्या होत्या, असे त्यांनी नमूद केले. ही वाढती ताकद भाजप सत्तेकडे वाटचाल करत असल्याचे संकेत देत असल्याचा दावा त्यांनी केला. तृणमूल सरकारवर हल्ला चढवताना शहा यांनी भ्रष्टाचार, गोदामातील आगीत २५ कामगारांचा मृत्यू, बेकायदा घुसखोरी असे अनेक मुद्दे उपस्थित केले. मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी आपला पुतण्या अभिषेक बॅनर्जी यांना मुख्यमंत्री बनवण्याच्या प्रयत्नात भ्रष्टाचाराच्या प्रकरणांकडे डोळेझाक केल्याचा आरोप त्यांनी केला. बंगालमध्ये भ्रष्टाचाराला संस्थात्मक स्वरूप देण्यात आले असून तो हजार कोटी रुपयांच्या पुढे गेला आहे, असा गंभीर आरोपही त्यांनी केला. भाषणादरम्यान शहा यांनी विविध भ्रष्टाचारप्रकरणांत तुरुंगात असलेल्या तृणमूल काँग्रेसच्या नेत्यांची नावे घेत सवाल उपस्थित केला की, या नेत्यांना पुन्हा निवडणूक लढवण्यासाठी तिकिटे दिली जातील का. ममता बॅनर्जी त्यांना तिकिटे देतील, अन्यथा हे नेते भ्रष्टाचार प्रकरणात 'भाईपो'चे नाव जाहीर करतील, असा टोला त्यांनी लगावला. सीमा सुरक्षेच्या मुद्द्यावरही शहा यांनी सरकारवर टीका केली. भाजप सत्तेवर आल्यास ४५ दिवसांत सीमा सुरक्षित केली जाईल, असा दावा त्यांनी केला. न्यायालयाच्या आदेशानंतरही तृणमूल सरकार बीएसएफला कुंपण घालण्यासाठी जमीन देत नाही, कारण घुसखोर ही त्यांची मतपेढी असल्याचा आरोप त्यांनी केला. बंगालमध्ये प्रशासन आणि पोलिस बेकायदा स्थलांतर रोखण्यात अपयशी ठरत असून बनावट कागदपत्रांच्या आधारे घुसखोरांना देशभरात पाठवले जात असल्याचा दावाही त्यांनी केला. कोलकात्याजवळील आनंदपूर येथील मोमो कारखान्याला लागलेल्या आगीचा संदर्भ देत शहा यांनी हा अपघात नसून सरकारच्या भ्रष्टाचाराचा परिणाम असल्याचे म्हटले. या प्रकरणात कारखाना मालकांना अद्याप अटक का झाली नाही, असा सवाल उपस्थित करत सत्ताधारी पक्षाशी असलेली जवळीक कारणीभूत आहे का, अशी शंकाही त्यांनी व्यक्त केली.

# सुनेत्रा पवारांची भावूक प्रतिक्रिया

## 'अजित पवारांच्या विचारांचा वारसा पुढे नेणार'

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई :** महाराष्ट्राच्या राजकारणात एका मोठ्या आणि भावूक बदलाची नोंद झाली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर निर्माण झालेली पोकळी भरून काढण्यासाठी त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांच्यावर मोठी जबाबदारी सोपवण्यात आली आहे. सुनेत्रा पवार यांनी राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतल्यानंतर सोशल मीडियाच्या माध्यमातून आपली पहिली अधिकृत प्रतिक्रिया दिली असून, त्यातून त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. मुंबईतील लोकभवन येथे पार पडलेल्या शपथविधीनंतर सुनेत्रा पवार यांनी अजित पवार यांच्या स्मृतींना उजाळा देत त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा निर्धार व्यक्त केला. त्यांनी म्हटले की, आदरणीय अजितदादांनी संपूर्ण आयुष्य शेतकरी, कष्टकरी, महिला, युवक आणि समाजातील वंचित घटकांसाठी समर्पित केले. त्यांचे विचार आणि कार्य हीच आपली खरी दिशा असल्याचे त्यांनी नमूद केले. 'आज अजित पवारांच्या विचारांचा वारसा पुढे नेताना आणि शिव-शाहू-फुले-आंबेडकर यांच्या विचारांवर निष्ठा ठेवून उपमुख्यमंत्रीपदाची जबाबदारी स्वीकारताना मन अक्षरशः भरून येत आहे,' असे त्यांनी आपल्या प्रतिक्रियेत म्हटले आहे.

राज्याच्या विकासासाठी आणि सर्वसामान्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या कठीण काळाबद्दल बोलताना सुनेत्रा पवार म्हणाल्या की, अजित पवार यांच्या अकाली जाण्याने दुःखाचा मोठा आघात बसला आहे. मात्र त्यांनी शिकवलेली कर्तव्यनिष्ठा, संघर्षाची ताकद आणि जनतेप्रती असलेली बांधिलकी हाच आपला खरा आधार आहे.

न्यायप्रिय, समताधिष्ठित आणि विकसित महाराष्ट्र उभारण्याचे अजित पवार यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी आपण प्रामाणिकपणे काम करत राहू, अशी ग्वाही त्यांनी दिली. महाराष्ट्रातील जनतेने दिलेल्या प्रेमाबद्दल आणि पाठिंब्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना त्यांनी सांगितले की, या कठीण प्रसंगी जनतेची साथ हेच आपले खरे बळ आहे. लोकांच्या विश्वासाच्या जोरावर आणि अजित पवार यांच्या विचारांना स्मरून नव्या आशेने पुढील वाटचाल करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

### ओडिशामध्ये अपघातात ५ जणांचा मृत्यू

**भुवनेश्वर :** ओडिशाच्या गंजम जिल्ह्यात भीषण रस्ता अपघातात पाच जणांचा मृत्यू तर सहा जण गंभीर जखमी झाले आहेत. बेरहमपूर शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १६ वरील हल्दियापदर येथे शनिवारी सकाळी हा अपघात घडला. प्रत्यक्षदर्शींनुसार, एक भरधाव ट्रक चुकीच्या बाजूने येत होता. या ट्रकने एकामागून एक तीन दुचाकींना जोरदार धडक दिली. धडकेनंतर ट्रक थेट पुलावर आदळला. अपघात इतका भीषण होता की घटनास्थळीच पाच जणांचा मृत्यू झाला, तर सहा जण गंभीर जखमी झाले. जखमींना तातडीने नजीकच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन वाहतूक सुरळीत केली.

## चार लाखांची लाच घेताना पोलीस निरीक्षक रंगेहात अटकेत; 'हाय-व्होल्टेज' ड्राम्याचा व्हिडिओ व्हायरल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बेंगळुरू :** कर्नाटकमधील बेंगळुरू येथे लोकायुक्त पोलिसांनी मोठी कारवाई करत एका पोलीस निरीक्षकाला चार लाख रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहात अटक केली. या कारवाईदरम्यान घडलेला नाट्यमय प्रसंगाचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला असून, त्यामुळे पोलीस दलातील भ्रष्टाचाराचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे.

अटक करण्यात आलेले पोलीस निरीक्षक गोविंदराजू हे केपी अग्रहारा पोलीस ठाण्यात कार्यरत होते. तक्रारदार असलेल्या एका बिल्डरकडून फसवणूक प्रकरणात मदत करण्याच्या बदल्यात त्यांनी पाच लाख रुपयांची लाच मागितल्याचा आरोप आहे. यापैकी



एक लाख रुपये आधीच स्वीकारण्यात आले होते, तर उरलेले चार लाख रुपये घेत असतानाच लोकायुक्त पोलिसांनी सापळा रचून त्यांना अटक केली.

अटकवेळी गोविंदराजू यांनी जोरदार प्रतिकार करत आरडाओरड केल्याचे व्हिडिओत स्पष्ट दिसते. लोकायुक्त अधिकाऱ्यांनी त्यांना ताब्यात घेताना संपूर्ण परिसरात काही काळ तणाव निर्माण झाला. या घटनेचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर नागरिकांमध्ये संतापाची भावना व्यक्त होत आहे. लोकायुक्त पोलिसांनी गोविंदराजू यांच्याविरोधात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल केला असून, या प्रकरणात इतर कोणी सहभागी आहे का, याचा तपास सुरू आहे. या कारवाईमुळे पोलीस दलाच्या प्रतिमेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असले तरी, भ्रष्टाचाराविरोधातील कठोर भूमिकेचे नागरिकांकडून स्वागत केले जात आहे.

## दिवंगत अजितदादा पवार यांच्या कार्याला अभिवादन

# पिंपरी-चिंचवडमध्ये साकारणार 'अजित सृष्टी'!

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी :** दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या उल्लेखनीय कार्याला आणि विकासदृष्टीला समर्पित 'अजित सृष्टी' हे भव्य स्मारक पिंपरी-चिंचवड शहरात साकारले जाणार आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या नवीन प्रशासकीय संकुलाच्या परिसरात हा प्रकल्प उभारण्याचा प्रस्ताव असून, त्याबाबतची प्रक्रिया आता वेगाने पुढे सरकू लागली आहे. भाजपाचे नेते व आमदार महेश लांडगे यांनी प्रशासनाला सविस्तर निवेदन देत या स्मारकासाठी आवश्यक नियोजनाबाबत पुढाकार घेतला आहे. नवीन प्रशासकीय संकुलाच्या एकूण ३३.८६ एकर जागेपैकी सुमारे ८.६५ एकर जागा 'अजित सृष्टी'साठी राखीव ठेवण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला आहे. या अनुषंगाने महापालिकेचे मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, आर्किटेक्ट सुनील पाटील यांच्यासह अधिकाऱ्यांची बैठक घेऊन प्रकल्पाच्या प्राथमिक रूपरेषेवर चर्चा करण्यात आली. या स्मारकात दिवंगत अजितदादा पवार यांचे पूर्णाकृती पुतळे, स्मरणस्थळ, माहिती केंद्र, शैक्षणिक व प्रेरणादायी प्रदर्शने तसेच 'अजितदादा पवार सभागृह' उभारण्याची योजना आहे.

'अजित सृष्टी' हा प्रकल्प केवळ स्मारकापुरता मर्यादित न राहता पिंपरी-चिंचवड शहराच्या विकासाचा इतिहास आणि त्या प्रवासातील अजितदादा पवार यांचे योगदान भावी पिढ्यांपर्यंत पोहोचवणारे केंद्र ठरणार आहे. शहराच्या स्थापनेपासून आजपर्यंत झालेल्या औद्योगिक, नागरी आणि सामाजिक बदलांची माहिती येथे एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहे. त्यामुळे हे स्मारक लोकसेवेची प्रेरणा देणारे आणि विकासाची दिशा दाखवणारे केंद्र बनेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

या प्रकल्पाला महापालिकेत तसेच स्थानिक राजकीय वर्तुळात सकारात्मक प्रतिसाद मिळत असून, अनेक नागरिकांनी याचे स्वागत केले आहे. अजितदादा पवार यांनी उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री म्हणून पायाभूत सुविधा, नागरी सेवा आणि प्रशासनातील निर्णयक्षमतेला नवी दिशा दिली. त्यांच्या कार्याचा वारसा जपण्यासाठी 'अजित सृष्टी' हा प्रकल्प महत्त्वाचा टप्पा ठरणार असल्याचे मत व्यक्त होत आहे.

प्रस्तावित स्मारकात पार्क, माहिती केंद्र आणि आधुनिक प्रदर्शनांची उभारणी करण्यात येणार असून, देश-विदेशातील नागरिकांना पिंपरी-चिंचवडच्या विकासकथेचा अनुभव घेता येणार आहे. या प्रकल्पाची रूपरेषा अंतिम टप्प्यात असून, लवकरच प्रत्यक्ष कामाला सुरुवात होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. 'अजित सृष्टी'च्या माध्यमातून दिवंगत नेत्याच्या कार्याचा, विचारांचा आणि विकासदृष्टीचा वारसा जपला जाईल, असा विश्वास स्थानिक नागरिक आणि नेत्यांनी व्यक्त केला आहे.

> "दिवंगत अजितदादा पवार यांनी महाराष्ट्राच्या विकासासाठी दिलेले योगदान शब्दात मांडता येणार नाही. 'अजित सृष्टी'च्या माध्यमातून त्यांच्या कार्याचा, विचारांचा आणि विकासदृष्टीचा वारसा जपला जाईल. हे स्मारक भावी पिढ्यांना लोकसेवेची प्रेरणा देणारे विकासाचे प्रतीक ठरेल."
>
> — **महेश लांडगे,** आमदार

## भीक मागण्याची लाज वाटते, मान शरमेने खाली जाते

### पाकचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांची कबुली

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**इस्लामाबाद :** कर्जबाजारी पाकिस्तानची आर्थिक स्थिती दिवसेंदिवस गंभीर होत चालली असून, याचे पडसाद थेट देशाच्या नेतृत्वाकडून उमटू लागले आहेत. पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी परदेशात आर्थिक मदतीसाठी हात पसरावे लागत असल्याची कबुली देत, याची आपल्याला लाज वाटत असल्याचे उघडपणे मान्य केले आहे. "मदत मागण्यासाठी बाहेर जावे लागते, तेव्हा शरमेने मान खाली जाते," असे भावनिक विधान त्यांनी केले.

शाहबाज शरीफ यांनी सांगितले की, पाकिस्तान अजूनही आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (IMF)च्या योजनांवर आणि परदेशी कर्जावर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे. देशाची ढासळलेली अर्थव्यवस्था सावरण्यासाठी त्यांनी लष्करप्रमुख फील्ड मार्शल असीम मुनीर यांच्यासह विविध देशांचा दौरा करून आर्थिक मदतीसाठी चर्चा केल्याचेही त्यांनी मान्य केले. पाकिस्तानमधील सर्वसामान्य जनता महागाई, बेरोजगारी, इंधन दरवाढ आणि पायाभूत सुविधांच्या कमतरतेमुळे होरपळून निघत आहे. परकीय चलन साठा कमी झाल्याने आयात मर्यादित करावी लागत आहे. कधी चीन, तर कधी आयएमएफकडे मदतीसाठी धाव घ्यावी लागणे हे पाकिस्तानच्या अपयशी आर्थिक धोरणांचे प्रतीक असल्याची टीका होत आहे. स्वतः पंतप्रधानांनीच ही हतबलता जाहीरपणे स्वीकारल्याने पाकिस्तानच्या आर्थिक आणि राजकीय परिस्थितीबाबत नव्याने चर्चा सुरू झाली आहे.

## संपादकीय

# सुरक्षिततेचा समज आणि बाजाराचा आरसा

**सोनं आणि चांदी यांना सुरक्षित गुंतवणुकीचा आधार मानणारी धारणा अलीकडील घसरणीने हादरवून टाकली. ही घसरण केवळ किमतींची नसून, बाजाराच्या मानसशास्त्राची, अपेक्षांच्या अतिरेकाची आणि सुरक्षिततेविषयीच्या रूढ कल्पनांचीही आहे, हे समजून घेणं आवश्यक ठरतं.**



सोनं आणि चांदी यांच्या किमतीत झालेली तीव्र घसरण ही एखाद्या नेहमीच्या बाजार दुरुस्तीपुरती मर्यादित घटना नाही. ती जागतिक अर्थव्यवस्थेतील बदलत्या संकेतांची, गुंतवणूकदारांच्या मानसिकतेतील अस्थिरतेची आणि 'सुरक्षित आश्रय' या संकल्पनेतील अंतर्विरोधांची जाणीव करून देणारी आहे. काही आठवड्यांपूर्वीपर्यंत या धातूंनी नवे उच्चांक गाठले होते. युद्ध, भू-राजकीय तणाव, महागाईची भीती आणि आर्थिक अनिश्चितता यामुळे सोनं-चांदीकडे पुन्हा एकदा आश्रयस्थान म्हणून पाहिलं जात होतं. मात्र बाजारात आश्रयाची भावना जितक्या झपाट्याने तयार झाली, तितक्याच वेगाने ती खाली आली. या घसरणीमागे एकच ठोस कारण शोधण्याचा प्रयत्न दिशाभूल करणारा ठरू शकतो. प्रत्यक्षात ही अनेक घटकांची एकत्रित परिणती आहे. सर्वात आधी लक्षात घ्यावी लागते ती अपेक्षांची उंची. भाववाढीच्या काळात बाजाराने वास्तवापेक्षा भीतीला अधिक महत्त्व दिलं. परिस्थिती अधिक बिघडेल, तणाव दीर्घकाळ टिकतील, महागाई आवाक्याबाहेर जाईल, अशा कल्पनांनी भावांना वर नेलं. पण जेव्हा धोरणात्मक संकेत बदलू लागले, तेव्हा या कल्पनांचा पाया कमकुवत असल्याचं उघड झालं. जागतिक चलनधोरणातील बदल हा या उलथापालथीचा एक महत्त्वाचा घटक ठरला. व्याजदर दीर्घकाळ उच्च राहण्याची शक्यता, आर्थिक स्थैर्याविषयी व्यक्त होणारा अधिक आत्मविश्वास आणि प्रमुख चलनांचं बळकटीकरण यामुळे सोनं-चांदीसारख्या व्याज न देणाऱ्या मालमत्तांकडे पाहण्याची दृष्टी बदलली. ज्या गुंतवणुकीकडे कालपर्यंत सुरक्षिततेचा आधार म्हणून पाहिलं जात होतं, तीच आज संधी खर्च वाढवणारी वाटू लागली. परिणामी नफा वसुलीचा प्रवाह जोर धरू लागला. या प्रक्रियेत मोठ्या संस्थात्मक गुंतवणूकदारांची भूमिका निर्णायक ठरली. त्यांनी केलेली एकाच वेळी विक्री बाजाराच्या दिशेला कलाटणी देणारी ठरली. आधीच तांत्रिकदृष्ट्या अतिखरेदीची स्थिती निर्माण झालेली असताना, विक्रीचा पहिला धक्का भावांवर मोठा परिणाम करणारा ठरला. त्यानंतर संगणकीय व्यवहार, मार्जिन कॉल्स आणि तरलतेचा ताण यामुळे घसरण अधिक तीव्र झाली. बाजारात घसरणीला घसरणच कारणीभूत ठरते, हा जुना अनुभव पुन्हा एकदा खरा ठरला. या सगळ्यातील सर्वात महत्त्वाचा पैलू म्हणजे मानसशास्त्र. सोनं म्हणजे कायम टिकणारं मूल्य, हा विश्वास केवळ आर्थिक नाही तर सांस्कृतिकही आहे. त्यामुळे भाव घसरू लागल्यावर तार्किक विश्लेषणापेक्षा भावनिक प्रतिक्रिया अधिक तीव्र होतात. सुरक्षित मानलेली मालमत्ता धोकादायक वाटू लागते आणि 'आधी बाहेर पडा' ही वृत्ती बळावते. हाच क्षण बाजारातील अस्थिरतेला धार देतो आणि घसरण अधिक खोलवर जाते. ही घसरण व्यापक अर्थाने एक महत्त्वाचा धडा देते. कोणतीही मालमत्ता कायमस्वरूपी सुरक्षित नसते. सुरक्षितता ही काळ, परिस्थिती आणि धोरणांवर अवलंबून असलेली सापेक्ष संकल्पना आहे. बाजार जेव्हा भावनांवर चालतो, तेव्हा वास्तव मागे पडतं. आणि जेव्हा वास्तव अचानक समोर येतं, तेव्हा भावनांच्या अतिरेकाची किंमत मोजावी लागते. भारतीय संदर्भात या घटनेचं महत्त्व अधिक आहे. सोनं ही केवळ गुंतवणूक नाही; ती बचत, परंपरा आणि सामाजिक सुरक्षिततेचं प्रतीक आहे. त्यामुळे भावातील मोठ्या चढउतारांचा परिणाम घरगुती अर्थकारणावरही होतो. मात्र या अनुभवातून एक स्पष्ट संदेश मिळतो आणि तो म्हणजे गुंतवणूक ही भावनेवर नव्हे, तर समजुतीवर आधारित असली पाहिजे. विविधीकरण, दीर्घकालीन दृष्टिकोन आणि धोरणात्मक संयम यांशिवाय सुरक्षिततेचा दावा फोल ठरतो. सोनं आणि चांदी कोसळली असं म्हणण्यापेक्षा सुरक्षिततेचा भ्रम उघडा पडला, असं म्हणणं अधिक समर्पक ठरेल. बाजार वेळोवेळी हेच दाखवून देतो की स्थैर्य हा कायमस्वरूपी गुणधर्म नसतो. जो गुंतवणूकदार हे वास्तव स्वीकारतो, तो अशा उलथापालथीत टिकतो. उरलेल्यांसाठी बाजार हा संधीपेक्षा अधिक कठोर शिक्षक ठरतो, हे लक्षात घेतले म्हणजे पुरे.

# युरोपची दारे उघडताच, शेजाऱ्यांची चिंता वाढली

**» भारत-युरोप मुक्त व्यापार करार हा केवळ दोन अर्थव्यवस्थांमधला व्यवहार नाही, तर दक्षिण आशियातील स्पर्धेची दिशा बदलणारा टप्पा आहे. भारतासाठी ही संधी असताना, पाकिस्तानसाठी तो इशारा ठरत आहे. वस्त्रोद्योगाच्या निमित्ताने हे बदलते वास्तव स्पष्टपणे समोर येते.**



भारत आणि युरोपियन संघ यांच्यातील मुक्त व्यापार करारामुळे जागतिक व्यापाराच्या पटावर एक नवी रेषा उमटली आहे. हा करार भारताच्या दृष्टीने दीर्घकालीन आर्थिक धोरणांचा परिपाक मानता येईल. मात्र त्याच वेळी, या कराराचे पडसाद शेजारी देशांच्या अर्थव्यवस्थांवरही उमटू लागले आहेत. पाकिस्तानमध्ये सुरू झालेली अस्वस्थता ही त्याचाच पुरावा आहे. विशेषतः वस्त्रोद्योगाच्या बाबतीत पाकिस्तानला आता स्वतःच्या मर्यादा अधिक ठळकपणे जाणवू लागल्या आहेत. युरोपियन संघ हा जगातील सर्वात मोठ्या आणि स्थिर ग्राहक बाजारांपैकी एक आहे. या बाजारात प्रवेश मिळवणे हे कोणत्याही निर्यातदार देशासाठी महत्त्वाचे असते. भारताला आता या बाजारात जवळजवळ टॅरिफमुक्त प्रवेश मिळणार आहे. याचा थेट फायदा भारताच्या वस्त्रोद्योगाला होणार आहे. उत्पादन क्षमता, किंमत स्पर्धा आणि पुरवठा साखळी यांचा विचार करता भारत या क्षेत्रात आधीच मजबूत स्थितीत आहे. मुक्त व्यापार कराराने त्या ताकदीला अधिकृत मान्यता दिली आहे. पाकिस्तानसाठी मात्र हीच बाब चिंतेची ठरत आहे. गेल्या अनेक वर्षांपासून पाकिस्तानचा वस्त्रोद्योग मोठ्या प्रमाणावर युरोपियन बाजारावर अवलंबून आहे. युरोपकडून मिळणाऱ्या सवलतींमुळे पाकिस्तानी वस्त्रे स्पर्धात्मक दरात पोहोचत होती. त्या सवलतींमुळे पाकिस्तानला भारतासारख्या मोठ्या उत्पादकांशी टक्कर देता येत होती. आता भारतालाच थेट आणि अधिक व्यापक सवलत मिळाल्याने हा तोल ढासळण्याची भीती व्यक्त केली जात आहे. पाकिस्तानमधील निर्यातदारांनी ही भीती उघडपणे व्यक्त केली आहे. त्यांचा मुद्दा साधा आहे. भारताला मिळणाऱ्या सवलतींमुळे किंमत, प्रमाण आणि वेळ या तिन्ही बाबतीत भारत पुढे जाईल. अशा परिस्थितीत पाकिस्तानचा तुलनात्मक फायदा नाहीसा होण्याची शक्यता आहे. वस्त्रोद्योग हा पाकिस्तानच्या अर्थव्यवस्थेचा कणा मानला जातो. परकीय चलन, रोजगार आणि औद्योगिक उत्पादन या तिन्ही बाबतीत या क्षेत्राचे योगदान मोठे आहे. त्यामुळे या उद्योगाला धक्का बसणे म्हणजे संपूर्ण अर्थव्यवस्थेवर ताण येणे. हा फरक नेमका कुठे आहे, याकडे पाहिल्यास दोन्ही देशांच्या धोरणात्मक वाटचालीतील अंतर स्पष्ट होते. भारताने गेल्या दशकात उत्पादन, पायाभूत सुविधा आणि निर्यात सुलभीकरण यावर भर दिला. उद्योगांना मोठ्या बाजाराशी जोडण्याचा प्रयत्न केला गेला. गुणवत्ता मानके, तांत्रिक सुधारणा आणि प्रमाणात्मक उत्पादन यांचा समन्वय साधण्यात भारताला यश मिळाले. त्यामुळे मुक्त व्यापार करार हा अचानक मिळालेला लाभ नसून, दीर्घ तयारीचा परिणाम आहे. पाकिस्तानमध्ये मात्र उद्योगधंद्यांची परिस्थिती अधिक नाजूक आहे. ऊर्जा दर, कच्चा माल, चलन अस्थिरता आणि आर्थिक व्यवस्थापनातील मर्यादा यांचा फटका उद्योगांना बसत राहिला आहे. त्यातच राजकीय अस्थिरता आणि धोरणात्मक अनिश्चितता यामुळे दीर्घकालीन नियोजनाला मर्यादा आल्या. परिणामी, उद्योग अधिकाधिक सवलतींवर अवलंबून राहिले. हीच अवलंबित्वाची साखळी आता कमकुवत ठरत आहे. या पार्श्वभूमीवर भारत-युरोप कराराकडे केवळ भारताच्या यशाच्या रूपात पाहणे पुरेसे ठरत नाही. हा करार जागतिक व्यापारातील स्पर्धेचे स्वरूप बदलत असल्याचे सूचित करतो. आता सवलतींपेक्षा क्षमता, दर्जा आणि विश्वासार्हता अधिक महत्त्वाची ठरणार आहे. जे देश या निकषांवर स्वतःला सिद्ध करू शकतील, त्यांनाच मोठ्या बाजारात टिकता येईल. भारतासाठी ही संधी असली तरी त्यासोबत जबाबदारीही आहे. मुक्त व्यापार कराराचा लाभ काही मोजक्या कंपन्यांपुरता मर्यादित न राहता व्यापक उद्योग क्षेत्रापर्यंत पोहोचला पाहिजे. रोजगारनिर्मिती, मूल्यवर्धन आणि निर्यातीत विविधता साधली तरच या कराराचा खरा अर्थ सिद्ध होईल. पाकिस्तानसाठी हा करार धोक्याची घंटा आहे.

केवळ बाह्य सवलतींवर आधारलेली अर्थव्यवस्था दीर्घकाळ टिकत नाही, हे वास्तव आता अधिक स्पष्ट होत आहे. उद्योगांना सक्षम करण्यासाठी धोरणात्मक सुधारणा, उत्पादनक्षमता वाढ आणि बाजाराभिमुख दृष्टीकोन आवश्यक आहे. अन्यथा जागतिक व्यापारातील बदलते प्रवाह देशाला अधिक मागे टाकतील. शेवटी, भारत-युरोप मुक्त व्यापार करार हा दोन देशांपुरता मर्यादित नाही. तो संपूर्ण दक्षिण आशियासाठी एक संदेश आहे. जागतिक बाजारात स्थान टिकवायचे असेल, तर तयारी, सातत्य आणि धोरणात्मक स्पष्टता यांना पर्याय नाही. संधी आणि संकट यांच्यातील फरक बहुतेक वेळा दृष्टीकोनातच दडलेला असतो.

# हुतात्मा दिनानिमित्त महापालिकेत दोन मिनिटे स्तब्धता

## अधिकारी-कर्मचाऱ्यांकडून स्वातंत्र्यवीर हुतात्म्यांना भावपूर्ण आदरांजली

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी चिंचवड :** देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात प्राणार्पण केलेल्या हुतात्म्यांच्या पवित्र स्मृतींना अभिवादन करण्यासाठी हुतात्मा दिनानिमित्त पिंपरी-चिंचवड महानगरपालिका सकाळी ठीक ११ वाजता दोन मिनिटांसाठी स्तब्ध झाली. महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार हा उपक्रम अत्यंत शिस्तबद्ध व शांत वातावरणात राबविण्यात आला.

सकाळी ११ वाजता बेल वाजवून स्तब्धतेस सुरुवात करण्यात आली. यावेळी महापालिकेची सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालये, आस्थापना तसेच उपस्थित अधिकारी, कर्मचारी व नागरिकांनी आपापली कामे थांबवून दोन मिनिटे मौन पाळले. या क्षणी शब्द थांबले, हालचाली थांबल्या आणि देशासाठी बलिदान दिलेल्या वीरांच्या स्मृती जागवणारा वातावरणात गंभीर शांततेचा अनुभव आला.

या कार्यक्रमाला अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, विक्रांत बगाडे, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, लेखाधिकारी अंकुश कदम, कर्मचारी महासंघ प्रतिनिधी विशाल भुजबळ, नागेश जाधव यांच्यासह महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरवर्षी ३० जानेवारी रोजी देशभरात हुतात्मा दिन साजरा करण्यात येतो. या दिवशी महात्मा गांधीजींसह स्वातंत्र्यलढ्यात प्राणार्पण केलेल्या सर्व हुतात्म्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी दोन मिनिटे मौन पाळले जाते. त्याच अनुषंगाने पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीनेही आज सकाळी दोन मिनिटे स्तब्धता पाळून हुतात्म्यांच्या त्यागाला नमन करण्यात आले.

या उपक्रमाद्वारे देशाच्या स्वातंत्र्यासाठी सर्वोच्च बलिदान दिलेल्या हुतात्म्यांप्रती कृतज्ञता व्यक्त करत त्यांच्या अमर स्मृतींना भावपूर्ण आदरांजली अर्पण करण्यात आली.

# काळा घोडा कला महोत्सवासाठी पिंपरी-चिंचवडच्या विद्यार्थ्यांची तयारी पूर्ण

## महापालिका शाळांतील कला मॉडेल्सचे मुंबईत प्रदर्शन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी चिंचवड :** देशातील प्रतिष्ठित काळा घोडा कला महोत्सवासाठी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या चार प्राथमिक शाळांची निवड झाली असून, या शाळांतील विद्यार्थ्यांनी साकारलेल्या कला मॉडेल्सची तयारी पूर्ण झाली आहे. ३१ जानेवारी ते ८ फेब्रुवारी २०२६ दरम्यान मुंबईतील ऐतिहासिक काळा घोडा परिसरात होणाऱ्या या महोत्सवात ३१ जानेवारी रोजी विद्यार्थ्यांची कला मॉडेल्स प्रदर्शनासाठी ठेवली जाणार आहेत. ११ ते १२ वयोगटातील विद्यार्थ्यांनी आपल्या कला शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली



'अंतर्गत वळण', 'मानवी विचारांचे रोलरकोस्टर', 'रूपांतरण' आणि 'स्कायवॉक' अशा संकल्पनांवर आधारित मॉडेल्स साकारली आहेत. आयुक्त श्रावण हर्डीकर व अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेली ही कामगिरी विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर कला सादर करण्याची मोठी संधी ठरणार आहे.

# ओला, सुका, घातक व सॅनिटरी कचरा वेगळा द्या; आरोग्य विभागाचा भर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहरातील स्वच्छता व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी महापालिकेच्या वतीने विविध स्तरांवर उपाययोजना राबविण्यात येत असून, या मोहिमेत नागरिकांचा सक्रिय सहभाग वाढवण्यावर भर देण्यात येत आहे. त्याच अनुषंगाने महापालिकेच्या आरोग्य विभागाने नागरिकांना घरगुती कचरा ओला, सुका, घातक आणि सॅनिटरी अशा चार प्रकारांत विलगीकरण करूनच कचरा संकलनासाठी येणाऱ्या घंटागाडीला देण्याचे आवाहन केले आहे.

महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर व अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल व सहायक आयुक्त अमित पंडित यांच्या अधिपत्याखाली शहरातील सर्व प्रभागांमध्ये व्यापक जनजागृती मोहीम राबवली जात आहे. या मोहिमेत घराघरांत संपर्क, फलक, पत्रके, समाजमाध्यमांद्वारे संदेश, तसेच स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने प्रबोधनात्मक उपक्रम राबवले जात आहेत.

योग्य पद्धतीने कचरा विलगीकरण केल्यास कचऱ्यावर वैज्ञानिक प्रक्रिया करणे सुलभ होते, पुनर्वापराचे प्रमाण वाढते, लँडफिलवरील ताण कमी होतो आणि पर्यावरण संरक्षणास चालना मिळते. यामुळे शहरातील दुर्गंधी, कचऱ्याचे ढीग आणि प्रदूषणावरही नियंत्रण ठेवता येते.

# नवले ब्रिजवर 3 दिवस वाहतूक बंद!

## ३ ते ५ फेब्रुवारी सकाळी २ तास वाहतूक ठप्प; गॅन्ट्री आणि स्पीड कॅमेरे बसविण्याचे काम

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** पुणे-सातारा महामार्गावरील वाहतुकीसंदर्भात महत्त्वाची माहिती समोर आली असून, कात्रज नवीन बोगदा ते नवले ब्रिज दरम्यान साताराकडून मुंबईकडे जाणारी वाहतूक ३ ते ५ फेब्रुवारीदरम्यान सलग तीन दिवस सकाळी ६ ते ८ वाजेपर्यंत बंद राहणार आहे. या कालावधीत महामार्गावर स्पीड नियंत्रणासाठी गॅन्ट्री आणि स्पीड कॅमेरे बसविण्याचे काम करण्यात येणार आहे.

भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (NHAI) कार्यालयाच्या वतीने ही माहिती देण्यात आली असून, या कामामुळे होणारी संभाव्य वाहतूक कोंडी टाळण्यासाठी नागरिकांनी आधीच प्रवासाचे नियोजन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. विशेषतः सकाळच्या वेळेत मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या वाहनचालकांना या निर्णयाचा फटका बसणार आहे.

वाहतूक बंद असलेल्या या कालावधीत कात्रज जुना बोगदा तसेच सेवा रस्त्यांचा वापर करण्याचे पर्यायी मार्ग नागरिकांना उपलब्ध करून देण्यात आले आहेत. मात्र, या मार्गांवरही गर्दी होण्याची शक्यता असल्याने वाहनचालकांनी संयम बाळगावा, असे आवाहन करण्यात आले आहे. दरम्यान, नवले पूल हा पुण्यातील अपघातप्रवण १९ रस्त्यांच्या यादीत सर्वाधिक धोकादायक ठरला आहे. या परिसरात सातत्याने गंभीर अपघात होत असून, अनेकवेळा जीवितहानीच्या घटनाही घडल्या आहेत. याच पार्श्वभूमीवर पुणे वाहतूक पोलिसांनी कात्रज नवीन बोगदा ते नवले ब्रिज या संपूर्ण टप्प्यावर ४० किमी प्रतितास वेगमर्यादा लागू केली आहे. याआधी येथे ३० किमी प्रतितास वेगमर्यादा होती.

वेगमर्यादा ओलांडणाऱ्या वाहनचालकांवर सीसीटीव्ही, स्पीड गन तसेच नव्याने बसविण्यात येणाऱ्या स्पीड कॅमेऱ्यांद्वारे कठोर कारवाई केली जाणार आहे. त्यामुळे वाहनचालकांनी नियमांचे पालन करणे अत्यावश्यक ठरणार आहे.

# उभ्या गाड्या, गाडलेली चेंबर्स आणि वर डांबराचा मुलामा!

## पुण्यात रातोरात 'गुळगुळीत' रस्त्यांचा घाट; मनपाच्या कामावर पुणेकरांचा संताप

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी चिंचवड : पुणे :** एरवी साध्या खड्ड्यांसाठीही महिनोन्महिने पाठपुरावा करायला लावणाऱ्या पुणे महानगरपालिकेने एका रात्रीत रस्ता 'गुळगुळीत' करण्याचा पराक्रम करून दाखवला आहे. मात्र, या डांबरीकरणामागची घाई आणि बेपर्वाई पाहता पुणेकर संतप्त झाले असून, मनपाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

संबंधित रस्त्यावर डांबरीकरण करताना प्रशासनाने किमान प्राथमिक नियमांनाही हरताळ फासल्याचे चित्र समोर आले आहे. रस्त्याच्या कडेला पार्क केलेली वाहने न हटवता, तसेच ड्रेनेज चेंबर्सची उंची समतल न करता थेट त्यावर डांबर टाकण्यात आले. परिणामी, डांबरीकरण हे रस्त्याऐवजी गाड्या आणि चेंबर्स भोवतीच झाल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे.

स्थानिक रहिवाशांनी दिलेल्या माहितीनुसार, टाकण्यात आलेला डांबरीकरणाचा थर अत्यंत पातळ व निकृष्ट दर्जाचा आहे. काही ठिकाणी हा थर हाताने कुरतडला तरी निघेल इतका हलका असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, वाहनांच्या भोवती डांबर टाकून काम उरकण्यात आले असून, गाड्या हलवल्यानंतर त्या ठिकाणी जुना, खराब रस्ताच तसाच दिसून येत आहे. यामुळे हे काम केवळ कागदोपत्री पूर्ण झाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

याचबरोबर, ड्रेनेज चेंबर्स डांबराखाली गाडल्या गेल्या किंवा त्या रस्त्याच्या पातळीपेक्षा सखल राहिल्याने भविष्यात पावसाळ्यात पाणी साचण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे काही दिवसांतच रस्ता पुन्हा खराब होणार, खड्डे पडणार आणि अपघातांचा धोका वाढणार, अशी भीती नागरिक व्यक्त करत आहेत.

"वाहने हटवणे, चेंबर्स समतल करणे आणि योग्य जाडीचा डांबराचा थर देणे, हे मूलभूत नियम असताना प्रशासनाने याकडे डोळेझाक का केली?" असा संतप्त सवाल पुणेकर विचारत आहेत. कंत्राटदाराला एवढ्या घाईत काम उरकण्याची मुभा कोणी दिली, आणि यावर संबंधित अधिकाऱ्यांची देखरेख होती की नाही, याबाबतही शंका उपस्थित होत आहे.

### पुणेकरांच्या अडचणी आणखी वाढवणार

● निकृष्ट काम करणाऱ्या कंत्राटदारावर कठोर कारवाई करावी, तसेच संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. अन्यथा 'गुळगुळीत' रस्त्यांचा हा प्रकार केवळ फोटोपुरता मर्यादित राहून, प्रत्यक्षात पुणेकरांच्या अडचणी आणखी वाढवणार, हे मात्र निश्चित आहे.

# महात्मा गांधी पुण्यतिथीनिमित्त महापालिकेत अभिवादन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने त्यांच्या स्मृतींना भावपूर्ण अभिवादन करण्यात आले. पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनात असलेल्या महात्मा गांधी यांच्या प्रतिमेस अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली.

महात्मा गांधी यांनी सत्य, अहिंसा, त्याग आणि मानवतेच्या मूल्यांवर आधारित स्वातंत्र्यलढ्याचे नेतृत्व केले. त्यांच्या विचारांनी केवळ भारतालाच नव्हे तर संपूर्ण जगाला शांततेचा मार्ग दाखवला. त्यांच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने त्यांच्या आदर्शांचा स्मरण करून, त्या विचारांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा कार्यक्रम पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. या प्रसंगी मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, सहाय्यक आयुक्त परशुराम वाघमोडे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, कर्मचारी महासंघाचे प्रतिनिधी विशाल भुजबळ, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान उपस्थितांनी महात्मा गांधी यांच्या जीवनकार्याला उजाळा दिला. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी त्यांनी दिलेले बलिदान, समाजातील दुर्बल घटकांसाठी केलेले कार्य आणि सत्य व अहिंसेच्या माध्यमातून उभे केलेले लोकशाही मूल्य यांचे स्मरण करण्यात आले. महात्मा गांधी यांचे विचार आजच्या काळातही तितकेच मार्गदर्शक असून, प्रशासन, समाजसेवा आणि सार्वजनिक जीवनात त्यांचे पालन करणे आवश्यक असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### लोणी काळभोरमध्ये भाजपला जनतेची पसंती

**लोणी (ता. आंबेगाव) :** , विकासाच्या मुद्द्यावर भाजपचा प्रचार वेगात – योगेश काळभोर

लोणी काळभोर, ता. ३१ : जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर लोणी काळभोर परिसरात भाजपच्या प्रचाराला जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, यामुळे विरोधकांच्या गोटात घबराट निर्माण झाली आहे, असे माजी सरपंच योगेश काळभोर यांनी सांगितले. रस्ते, पाणीपुरवठा, ड्रेनेज व मूलभूत सुविधांची ठोस कामे झाल्याने भाजपचा विकासाचा अजेंडा प्रत्यक्षात उतरल्याचे दिसते. खऱ्या अर्थाने सर्वांगीण विकासासाठी भाजपलाच प्रचंड बहुमताने विजयी करण्याचे आवाहन त्यांनी केले.

### आळे येथे राजेंद्र आल्हाट यांचे बेमुदत महाधरणे आंदोलन

**आळेफाटा :** विविध प्रलंबित मागण्यांसाठी आळे (ता. जुन्नर) येथील डॉ. अण्णा भाऊ साठे राष्ट्रीय स्मारक स्थळी रविवारी (ता. १) बेमुदत महाधरणे आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती उपोषणकर्ते राजेंद्र आल्हाट यांनी दिली. स्मारकासाठी जमिनीचा प्रस्ताव, शासकीय जमिनीवरील अतिक्रमण, वाटपातील गैरप्रकार व खूनप्रकरणी कारवाईच्या मागण्यांसाठी २००९ पासून आंदोलने सुरू असूनही न्याय न मिळाल्याने आंदोलनाचा निर्णय घेण्यात आला आहे.

### आळेफाटा उपबाजारात कांद्याची विक्रमी आवक

**आळेफाटा :** आळेफाटा, ता. ३१ : जुन्नर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आळेफाटा उपबाजारात शुक्रवारी (ता. ३०) २७ हजार ८१५ कांदा पिशव्यांची विक्रमी आवक झाली. प्रतवारीनुसार एक नंबर कांद्यास दहा किलोस १५१ रुपये, दोन नंबरला १३० ते १५०, तीन नंबरला ११० ते १३० तर बदला कांद्यास ३० ते ९० रुपये बाजारभाव मिळाला. मात्र वाढत्या आवकेमुळे कांद्याचे दर घसरत आहे.

---

### अपघात टाळण्यासाठी ओतूर पोलिसांचा रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत जनजागृती उपक्रम

# वाहने चालविताना नियमांचे काटेकोर पालन करा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**ओतूर :** वाढत्या रस्ते अपघातांवर नियंत्रण मिळवण्यासाठी वाहनचालकांनी वाहतुकीच्या नियमांचे काटेकोर पालन करणे अत्यंत आवश्यक आहे, असे आवाहन ओतूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक लहू थाटे यांनी केले. ओतूर पोलीस ठाण्याच्या वतीने शरदचंद्र पवार कॉलेज ऑफ फार्मसी येथे रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत विद्यार्थी, शिक्षक, वाहनचालक व वाहनमालकांना वाहतुकीच्या नियमांबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यशाळेत बोलताना सहाय्यक पोलीस निरीक्षक लहू थाटे म्हणाले की,




बहुतांश अपघात हे मानवी निष्काळजीपणामुळे होतात. वाहन चालवताना मोबाईलवर बोलणे, मद्यप्राशन करून वाहन चालवणे, वेगमर्यादा ओलांडणे, हेल्मेट किंवा सीट बेल्ट न वापरणे, विना परवाना व विना विमा वाहन चालवणे यामुळे अपघातांचे प्रमाण वाढते.

त्यामुळे प्रत्येक वाहनचालकाने स्वतःच्या व इतरांच्या सुरक्षिततेसाठी नियमांचे पालन करणे गरजेचे आहे.

ते पुढे म्हणाले की, दुचाकी चालविताना हेल्मेट आणि चारचाकी वाहन चालविताना सीट बेल्ट वापरणे बंधनकारक आहे. वाहन चालवताना मोबाईलचा वापर टाळावा, कारण काही क्षणांचा निष्काळजीपणा जीवघेणा ठरू शकतो.

तसेच विना लायसन्स किंवा विना इन्शुरन्स वाहन चालवणे हा कायद्याने गुन्हा असून अशा प्रकारांना कठोर दंडात्मक कारवाईला सामोरे जावे लागू शकते, याचीही त्यांनी जाणीव करून दिली.

या वेळी ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टर व इतर जड वाहनांबाबतही विशेष सूचना देण्यात आल्या. ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरला मागील बाजूस रिफ्लेक्टर बसवणे अत्यावश्यक असून रात्रीच्या वेळी इतर वाहनचालकांना ट्रॅक्टर लवकर दिसण्यासाठी याचा मोठा उपयोग होतो. वाहतुकीची चिन्हे, सिग्नल व नियमांचे पालन केल्यास अपघात टाळता येऊ शकतात, असे त्यांनी स्पष्ट केले. रस्ता ओलांडताना पादचाऱ्यांनी झेब्रा क्रॉसिंगचा वापर करावा, वाहतुकीच्या दिशेचे भान ठेवावे तसेच लहान मुले व ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षिततेकडे विशेष लक्ष द्यावे, असेही मार्गदर्शन यावेळी करण्यात आले. कार्यशाळेनंतर वाहनचालक व वाहनमालकांची स्वतंत्र बैठक घेऊन त्यांना वाहतूक नियम, दंडात्मक तरतुदी व सुरक्षित वाहनचालना संदर्भात सखोल माहिती देण्यात आली.

#### रस्ता सुरक्षेबाबत सकारात्मक जागृती

● या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये व वाहनचालकांमध्ये रस्ता सुरक्षेबाबत सकारात्मक जागृती निर्माण झाली. अपघातमुक्त समाज घडवण्यासाठी पोलिस, नागरिक व वाहनचालक यांनी एकत्रितपणे जबाबदारी स्वीकारली पाहिजे, असे मत उपस्थितांनी व्यक्त केले. ओतूर पोलीस ठाण्याच्या या जनजागृती उपक्रमाचे सर्व स्तरांतून स्वागत करण्यात येत असून, भविष्यातही असे उपक्रम राबवावेत, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली.

---

## जलजीवनसाठी १० टक्के लोकवर्गणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

➕ ग्रामीण भागातील नागरिकांचे राहणीमान सुधारण्यासाठी केंद्र शासनाचा निर्णय

➕ मंजूर कामे : १५८
पूर्ण कामे : ७६
अपूर्ण कामे : ८६
आजवर मंजूर निधी : ११७ कोटी
एकूण गरज : १६१ कोटी

**राजगुरुनगर :** खेड तालुक्यात जलजीवन मिशनच्या माध्यमातून प्रत्येक घरात नळाच्या माध्यमातून पाणी मिळावे. किमान ५५ लिटर शुद्ध पाणी प्रत्येक कुटुंबाला मिळावे हा याचा मुख्य उद्देश आहे. ग्रामीण भागातील नागरिकांचे राहणीमान सुधारण्यासाठी केंद्र शासनाने हा निर्णय घेतला आहे.

शाश्वत पाण्याच्या स्रोताच्या माध्यमातून पाणी मिळावे हा या योजनेचा मुख्य उद्देश होता. यासाठी प्रत्येक ग्रामपंचायतीकडून १० टक्के लोकवर्गणी गोळा करण्याच्या सूचना होत्या. दुष्काळग्रस्त भागात योजनेच्या माध्यमातून पाणी पोहोचवले जाणार होते. मात्र या कामावर पैसा नसल्याने ही योजना अडचणीत असल्याचे चित्र दिसत आहे.

जलजीवन मिशन अंतर्गत करण्यात येणाऱ्या पाणीपुरवठा योजनेच्या खर्चाचा भार केंद्र शासन ४५ टक्के व राज्य शासन ४५ टक्के उचलणार आहे. उर्वरित १० टक्के निधी संबंधित ग्रामपंचायतीने उभारायचा आहे.

याबाबत प्रत्यक्ष ग्रामपंचायतीलाही पुरेशी माहिती नसल्याचे चित्र आहे. त्यामुळे कामकाज झालेल्या ठिकाणी १० टक्के लोकवर्गणी उभी कशी करायची, असा प्रश्न निर्माण झाला आहे. खेड तालुक्यात जलजीवन मिशनच्या माध्यमातून १५८ कामे सुरू आहेत. मात्र यातील केवळ काही ग्रामपंचायतींनी लोकवर्गणी गोळा केली आहे. इतर ग्रामपंचायतींनी अद्याप लोकवर्गणीची प्रक्रिया राबवलेली नाही. अनुसूचित जाती-जमाती बहुल ग्रामपंचायतींना पाच टक्के निधी उभारण्याची तरतूद आहे. मात्र हा निधीही अनेक ठिकाणी उभा राहिलेला नाही.

---

## आंबेगावच्या पूर्व भागात बिबट्यांचा वाढता वावर; ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण

### लोणी-धामणी परिसरातील घाट रस्त्यांवर सलग तीन बिबट्यांचे दर्शन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात सध्या बिबट्यांचा वावर मोठ्या प्रमाणात वाढल्याने ग्रामस्थ व शेतकरी वर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. लोणी परिसरातील लोणी-खेड रस्त्यावरील बागवस्ती घाट, खंडागळे वस्तीचा डोंगरभाग, तसेच धामणी-शिरदाळे येथील घाट, पहाडदरा घाट आणि धामणी खिंड-ज्ञानेश्वर महाराज मंदिर परिसरात बिबट्यांचा वावर असल्याचे स्थानिक ग्रामस्थ व शेतकरी सांगत आहेत.

शुक्रवारी (दि.३०) ह.भ.प. सचिन महाराज बेंडे (रा. सासवड, ता. पुरंदर) हे सासवड परिसरातील कार्यक्रम आटोपून रात्री साधारण ११ ते १२ वाजण्याच्या सुमारास पडाडधरा घाटातून मंचरकडे जात असताना त्यांना सलग तीन बिबट्यांचे दर्शन झाल्याची माहिती त्यांनी शनिवारी (दि.३१) जारकरवाडी



येथे प्रवचन सेवेदरम्यान दिली. घाट रस्त्यावर एकामागोमाग एक असे तीन बिबटे निर्धास्तपणे चालताना दिसल्याने कारमध्ये असतानाही भीतीची भावना निर्माण झाल्याचे त्यांनी सांगितले.

या परिसरात यापूर्वीही अनेक वेळा बिबट्यांचा वावर असल्याच्या घटना समोर आल्या आहेत.

सध्या भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याची ऊस तोड मोठ्या प्रमाणात सुरू असल्याने बिबट्यांची दडण कमी होत असून, त्यामुळे बिबटे ऊसाच्या शेतातून डोंगरभागातील झाडाझुडपांचा आधार घेत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

दरम्यान, शेतकऱ्यांनी शेतात काम करताना तसेच जनावरे, शेळ्या-मेंढ्या चरायला नेताना विशेष सावधगिरी बाळगावी, असे आवाहन वनविभागाच्या वतीने करण्यात येत आहे. बिबट्यांचा वावर असलेल्या काही ठिकाणी वनविभागाने पिंजरे बसविले असले तरी, वाढत्या बिबट्या दर्शनाच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीती कायम आहे. त्यामुळे बिबट्या संदर्भात प्रभावी जनजागृती करून वनविभागाने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

---

## लोणी-धामणी परिसरात रस्त्यावर सोडलेले वासरू आढळले

### दुग्धव्यवसायिकांची बेफिकिरी; बिबट्या मानवी वस्तीकडे येण्याची भीती

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** लोणी (ता. आंबेगाव) येथील लोणी-पाबळ रस्त्याच्या शिवेवर रस्त्याच्या कडेला अवघ्या दोन ते अडीच महिन्यांचे वासरू (घोरं) सोडल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. हे वासरू गेल्या दोन दिवसांपासून तसेच पडून असल्याचे निदर्शनास आले असून, संबंधित दुग्धव्यवसायिकांच्या अमानवी वर्तनामुळे संताप व्यक्त केला जात आहे.

लोणी येथील सामाजिक कार्यकर्ते दिलीप वाळूंज यांनी हे वासरू पाहिल्यानंतर तात्काळ त्याला बाटलीच्या साहाय्याने पाणी पाजून मदत केली. या घटनेनंतर परिसरातील नागरिकांनी नाराजी व्यक्त करत दुग्धव्यवसायिकांच्या निष्काळजीपणावर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, काही दुग्धव्यवसायिक जर्सी गायीला नर वासरू झाल्यास त्याची योग्य देखभाल न करता, थेट रस्त्याच्या कडेला किंवा रानावणात सोडून



देतात. असे वासरू जिवंत राहते की मरते, याची साधी चौकशीही केली जात नाही. ही बाब केवळ प्राण्यांवरील क्रूरतेचेच नव्हे, तर सामाजिक जबाबदारीच्या अभावाचेही द्योतक असल्याचे बोलले जात आहे.

यापूर्वीही धामणी येथील खंडोबा फाटा, लोणी-वाफगाव रस्ता, शिरदाळे फाटा परिसरात अशाच प्रकारे दोन ते अडीच महिन्यांची लहान वासरे सोडण्यात आल्याच्या घटना घडल्या आहेत. यामुळे परिसरात बिबट्याला आयते खाद्य मिळत असून, बिबट्या मानवी वस्तीकडे येण्याची गंभीर शक्यता निर्माण झाली आहे. परिणामी, नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

खरे तर अशा लहान वासरांना रस्त्याच्या कडेला किंवा जंगलात सोडण्याऐवजी जनावरांच्या पांजरपोळात किंवा योग्य संरक्षण केंद्रात सोडणे आवश्यक आहे. प्रशासनाने अशा प्रकारांवर कठोर कारवाई करावी, तसेच पशुपालकांमध्ये जनजागृती करावी, अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून होत आहे. या घटनेमुळे प्राणी संरक्षण, मानवी सुरक्षितता आणि सामाजिक जबाबदारी या तिन्ही मुद्द्यांवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

---

## शाळा ही केवळ शिक्षण देणारी संस्था नसून मातृसंस्था – विद्यार्थ्यांचे भावनिक मनोगत

### श्री गाडगे महाराज विद्यालयातील दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ उत्साहात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**ओतूर :** येथील श्री गाडगे महाराज विद्यालयातील इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ शनिवारी (दि.३१) अत्यंत भावनिक वातावरणात संपन्न झाला. विद्यार्थ्यांच्या डोळ्यांत भविष्याची स्वप्ने होती, तर मनात शाळेच्या आठवणींचा गहिरा ठसा उमटलेला दिसून येत होता.

या प्रसंगी विद्यार्थ्यांनी आपल्या शालेय जीवनातील अविस्मरणीय क्षण, शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन, प्रेमळ शिस्त व प्रेरणादायी शिकवण यांविषयी मनापासून कृतज्ञता




व्यक्त केली. ही शाळा केवळ शिक्षण देणारी संस्था नसून आमच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास घडविणारी मातृसंस्था असल्याची भावना अनेक विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केली.

संत गाडगे महाराजांचे स्वच्छता, श्रमप्रतिष्ठा, माणुसकी व सामाजिक बांधिलकीचे विचार आम्हाला आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर मार्गदर्शक ठरतील, असा ठाम विश्वास विद्यार्थ्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी मनोगत, अनुभवकथन व भावनिक भाषणे सादर करत उपस्थितांची मने जिंकली. शिक्षकांविषयीचा आदर, आपुलकी व कृतज्ञता त्यांच्या शब्दांतून प्रकर्षाने जाणवत होती.

वैभवी आहेर, प्रणिता भोईर, प्रतिक्षा डुंबरे, श्रुती कुमकर, मुग्धा ठिकेकर, आदिती घोलप, साहिल पानसरे, तनय शेरकर, अभय घोडेराव व वेदांत शिंदे यांनी आपली मनोगते व्यक्त केली. यावेळी रविंद्र अहिनवे, सुनील पोकळे व अच्युत निक्रड यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत जीवनात मोठे ध्येय ठेवा व आदर्श नागरिक बना, असे आवाहन केले.

---

### यवत येथे श्री काळभैरवनाथ-महालक्ष्मी यात्रेची तयारी पूर्ण

**यवत : संपूर्ण पुणे जिल्ह्यात प्रसिद्ध असलेली यवत येथील ग्रामदैवत श्री काळभैरवनाथ व श्री महालक्ष्मी माता यांची माही पौर्णिमेनिमित्त होणारी वार्षिक यात्रा रविवार (दि. १) व सोमवार (दि. २) फेब्रुवारी रोजी पार पडणार असून यात्रेसाठी जय्यत तयारी करण्यात आली आहे. मात्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकस्मित निधनामुळे यंदाची यात्रा साध्या स्वरूपात साजरी करण्याचा निर्णय ग्रामस्थांनी घेतला आहे. त्यामुळे लोकनाट्य, कुस्ती आखाडा, ढोल-लेझीम स्पर्धा व शोभेचा दारुगोळा असे कार्यक्रम रद्द करण्यात आले आहेत. पहिल्या दिवशी पहाटे महापूजा, देवांना पाणी घालणे, पोशाख, दंडवत व नैवेद्य, तर सायंकाळी काठ्यांची व पालखी मिरवणूक होणार आहे. दुसऱ्या दिवशी केवळ महापूजा संपन्न होईल.**

---

## कर्तव्यनिष्ठेचा आदर्श जपणारे पोलीस उपनिरीक्षक सर्जेराव बोबडे सेवेतून निवृत्त

### ३५ वर्षांची निष्ठावान सेवा; लोणी काळभोर परिसरात हळहळ

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे / लोणी काळभोर :** पुणे शहर व सोलापूर (ग्रामीण) पोलीस दलात तब्बल ३५ वर्षे निष्ठेने सेवा बजावत शेकडो गंभीर गुन्ह्यांची यशस्वी उकल करणारे, शिस्तप्रिय व कर्तव्यदक्ष पोलीस उपनिरीक्षक सर्जेराव नागनाथ बोबडे हे शनिवारी (ता. ३१) शासकीय सेवेतून निवृत्त झाले. त्यांच्या निवृत्तीमुळे लोणी काळभोर परिसराने एक अनुभवी, संयमी आणि जनतेचा विश्वास संपादन केलेला अधिकारी गमावल्याची भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे.

आपल्या प्रदीर्घ सेवाकाळात पोलीस उपनिरीक्षक सर्जेराव बोबडे यांनी खून, बलात्कार, दरोडा, खुनाचा प्रयत्न यांसारख्या गंभीर गुन्ह्यांतील



आरोपींसाठी कर्दनकाळ ठरत प्रभावी तपास केला. गुन्हेगारीविरोधात कठोर कारवाई करतानाच सर्वसामान्य नागरिकांशी सौजन्यपूर्ण संवाद, तक्रारींची तत्काळ दखल घेणे आणि कायदा व सुव्यवस्थेचा काटेकोर अंमल ही त्यांच्या कार्यशैलीची ठळक वैशिष्ट्ये राहिली. सर्जेराव बोबडे यांचा जन्म एका सर्वसामान्य कुटुंबात झाला. माध्यमिक शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी पोलीस सेवेत जाण्याचा ध्यास घेतला. अथक परिश्रम, प्रामाणिकपणा व शिस्तीच्या बळावर त्यांची सोलापूर (ग्रामीण) पोलीस दलात पोलीस अंमलदार म्हणून नियुक्ती झाली. कालांतराने त्यांच्या कार्यतत्परतेची दखल घेत त्यांना पदोन्नती मिळत गेली आणि पुढे पुणे शहर पोलीस दलात फौजदार म्हणून त्यांनी महत्त्वपूर्ण जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली.

---

### इंद्रायणी नदी घाटावरील रक्षा विसर्जन स्थळ स्मारकात गांधी विचारांना भावपूर्ण वंदन

# राष्ट्रपिता महात्मा गांधी पुण्यतिथी दिनी अलंकापुरीत अभिवादन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**आळंदी :** राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त आळंदी येथील इंद्रायणी नदी घाटावरील राष्ट्रपिता महात्मा गांधी रक्षा विसर्जन स्थळ स्मारक येथे भावपूर्ण अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी महात्मा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली. तसेच पुष्पांजली अर्पण करून गांधीजींच्या जीवनकार्याचे आणि त्यांनी दिलेल्या मूल्यांचे स्मरण करण्यात आले.

कार्यक्रमात बोलताना उपस्थित मान्यवरांनी आधुनिक,



स्पर्धात्मक युगात महात्मा गांधी यांच्या विचारांचे संवर्धन करून ते प्रत्यक्ष आचरणात आणण्याची गरज अधोरेखित केली. सत्य, अहिंसा, समता, बंधुभाव आणि मानवतेचे मूल्य आजच्या सामाजिक व राजकीय परिस्थितीत अधिक महत्त्वाचे असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. गांधी विचारांना केवळ श्रद्धांजली न देता, ते दैनंदिन जीवनात अंगीकारणे हीच खरी आदरांजली असल्याचे मान्यवरांनी सांगितले.

या कार्यक्रमास महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस पक्षाच्या डॉक्टर सेलचे अध्यक्ष डॉ. मनोज राका, आळंदी शहराध्यक्ष संदीप नाईकरे पाटील, माजी शहराध्यक्ष नंदकुमार वडगावकर, तसेच मयुर कुऱ्हाडे, अर्जुन मेदनकर, महादेव पाखरे, गौरव सदानंद, राजेश नागरे, साहेब बांगर यांच्यासह परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी माजी शहराध्यक्ष नंदकुमार वडगावकर यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे विचार आजही प्रेरणादायी आहेत. स्पर्धेच्या युगात सामाजिक व राजकीय जीवनात सत्य, अहिंसा, समता आणि बंधुभाव या गांधीजींच्या मूल्यांची समाजाला नितांत गरज आहे. गांधी विचार हे केवळ इतिहासापुरते मर्यादित नसून, ते आजही समाजाला योग्य दिशा देत आहेत. समाजात सलोखा, शांतता आणि सामाजिक ऐक्य टिकवून ठेवण्यासाठी प्रत्येकाने गांधी विचार आत्मसात करावेत, असे आवाहन त्यांनी केले.

या अभिवादन कार्यक्रमातून महात्मा गांधी यांच्या अमर स्मृतींना वंदन करण्यात आले आणि त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प उपस्थितांनी व्यक्त केला.

---

## कुरकुंभ घाटात अखेर बसविले क्रॅश बॅरियर; प्रवाशांना दिलासा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कुरकुंभ :** दौंड-बारामती मार्गावरील कुरकुंभ (ता. दौंड) घाटात डाव्या बाजूस क्रॅश बॅरियर नसल्याने अपघाताचा गंभीर धोका निर्माण झाला होता. अनेक दिवसांपासून नागरिकांकडून होत असलेल्या मागणीची आणि प्रसारमाध्यमांतून झालेल्या पाठपुराव्याची दखल घेत अखेर प्रशासनाने घाटात क्रॅश बॅरियर तसेच तटबंदी बसवली आहे. त्यामुळे वाहनचालक आणि प्रवाशांनी सुटकेचा निश्वास सोडला आहे.

कुरकुंभ औद्योगिक वसाहतीकडे दररोज मोठ्या प्रमाणावर कामगार, तरुण वर्ग तसेच सर्वसामान्य नागरिकांची ये-जा असते. याशिवाय या मार्गावरून अवजड व मोठ्या वाहनांची वाहतूक सातत्याने सुरू असते. घाटाच्या शेवटच्या टोकाला वळणावर आवश्यक ती सुरक्षा व्यवस्था नसल्याने याठिकाणी अपघात होण्याची शक्यता कायम होती. पावसाळ्यात किंवा रात्रीच्या वेळी हा धोका अधिक वाढत असल्याने वाहनचालकांमध्ये भीतीचे वातावरण होते. या पार्श्वभूमीवर दैनिक सकाळच्या २२ डिसेंबरच्या अंकात कुरकुंभ घाटात तातडीने क्रॅश बॅरियर बसविण्याची गरज असल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले होते. या वृत्ताची दखल घेत प्रशासनाने आवश्यक उपाययोजना करत क्रॅश बॅरियर आणि तटबंदीचे काम पूर्ण केले आहे.

क्रॅश बॅरियर बसविल्यामुळे आता अपघाताचा धोका मोठ्या प्रमाणात कमी होणार असून प्रवास अधिक सुरक्षित होणार आहे. या कामाबद्दल नागरिकांनी प्रशासनासह दैनिक सकाळचे आभार मानले आहेत.

## सारांश वृत्त

### विमानात बॉम्बच्या धमकीने खळबळ

अहमदाबाद : कुवेतवरून दिल्लीला जाणाऱ्या इंडिगो एअरलाईन्सच्या विमानात बॉम्ब असल्याची धमकी मिळाल्याने एकच खळबळ उडाली. या घटनेनंतर खबरदारीचा उपाय म्हणून हे विमान तातडीने गुजरातमधील अहमदाबाद येथील सरदार वल्लभभाई पटेल आंतरराष्ट्रीय विमानतळावर उतरवण्यात आले. शुक्रवारी सकाळी ६.४० च्या सुमारास हे विमान सुरक्षितपणे लँड करण्यात आले असून, सर्व प्रवासी सुखरूप आहेत.

### यूपीतील मंत्र्यांना ५० कोटींपर्यंतच्या खर्च मान्यतेचा अधिकार

लखनौ : उत्तर प्रदेशातील योगी आदित्यनाथ सरकारने मंत्र्यांचे आर्थिक अधिकार वाढवले आहेत. आता मंत्री ५० कोटी रुपयांपर्यंतच्या प्रकल्पांना मंजुरी देऊ शकतात. यापूर्वी ही मर्यादा १० कोटी रुपयांपर्यंत होती. १५० कोटी रुपयांपर्यंतच्या प्रकल्पांना वित्तमंत्री मंजुरी देतील. यापेक्षा अधिकच्या प्रकल्पांना मुख्यमंत्री मंजुरी देतील. याव्यतिरिक्त, सरकारने अंगणवाडी सेविकांना मोठे गिफ्ट दिले आहे.

### हिमाचल सफरचंदांचा मुद्दा संसदेमध्ये मांडणार : रजनी पाटील

सिमला : सफरचंदावरील आयात शुल्क कमी करण्याचा मुद्दा संसदेत मांडणार असल्याची माहिती हिमाचल प्रदेशच्या काँग्रेस प्रभारी रजनी पाटील यांनी येथे शुक्रवारी माध्यमांशी बोलताना दिली. त्या म्हणाल्या, हिमाचलसाठी हा मोठा मुद्दा आहे. जर आयात शुल्क कमी केले, तर त्यामुळे हिमाचलचा सफरचंद उद्योग उद्ध्वस्त होईल.आता युरोपियन युनियनसोबत मुक्त व्यापार करार करून ३० टक्के शुल्क कमी करण्यात आले आहे. याच्या आडून इतर देशही आयात शुल्क कमी करण्यासाठी दबाव आणतील.


## मध्यमवर्गीयांना महागाईची झळ

# आजपासून बँकिंग नियमांमध्ये मोठे बदल!

### एसबीआय, एचडीएफसी, आयसीआयसीआय आणि पीएनबीच्या नियमांत बदल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई: देशातील कोट्यवधी बँक खातेदारांसाठी १ फेब्रुवारी २०२६ पासून महत्त्वाचे बदल लागू होणार आहेत. स्टेट बँक ऑफ इंडिया (SBI), एचडीएफसी बँक, आयसीआयसीआय बँक आणि पंजाब नॅशनल बँक (PNB) यांनी त्यांच्या काही प्रमुख सेवा व नियमांमध्ये सुधारणा जाहीर केल्या आहेत. या बदलांचा थेट परिणाम सामान्य ग्राहकांच्या दैनंदिन व्यवहारांवर, डिजिटल पेमेंट्सवर, क्रेडिट कार्डच्या सुविधांवर तसेच केवायसी प्रक्रियेवर होणार आहे. त्यामुळे या बँकांचे ग्राहक असाल, तर हे बदल समजून घेणे अत्यंत गरजेचे ठरणार आहे.**




**एसबीआयचे नवीन नियम – आयएमपीएस व्यवहार महागणार**

देशातील सर्वात मोठी सार्वजनिक क्षेत्रातील बँक असलेल्या एसबीआयने आयएमपीएस (IMPS) व्यवहारांसाठी संबंधित सेवा शुल्कात बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. १५ फेब्रुवारी २०२६ पासून हे नवीन नियम लागू होतील. डिजिटल व्यवहारांचा वाढता वापर पाहता, आयएमपीएसद्वारे पैसे पाठवणाऱ्या ग्राहकांवर अतिरिक्त शुल्काचा भार पडण्याची शक्यता आहे. विशेषतः लहान-मोठ्या व्यवहारांसाठी वारंवार आयएमपीएसचा वापर करणाऱ्या ग्राहकांना या बदलाचा अधिक फटका बसू शकतो.

**आयसीआयसीआय बँक – क्रेडिट कार्डधारकांना झटका**

१ फेब्रुवारी २०२६ पासून आयसीआयसीआय बँक आपल्या काही क्रेडिट कार्डवरील लोकप्रिय BOOKMYSHOW मोफत चित्रपट तिकिटांचा लाभ बंद करणार आहे. आतापर्यंत अनेक ग्राहक या सुविधेचा नियमित लाभ घेत होते. मात्र, बँकेने स्पष्ट केले आहे की वाहतूक आणि विमा खर्चावर मिळणारे रिवॉर्ड पॉइंट्स कायम राहतील. काही निवडक कार्डांसाठी रिवॉर्ड सिस्टम अधिक मजबूत करण्यात येणार असून, चित्रपट सवलतीऐवजी इतर फायदे देण्यावर भर दिला जाणार आहे.

**एचडीएफसी बँक – प्रीमियम कार्डधारकांसाठी नवे बंधन**

एचडीएफसी बँकेने आपल्या इन्फिनिया मेटल क्रेडिट कार्डधारकांसाठी रिवॉर्ड पॉइंट रिडेम्पशनचे नियम बदलले आहेत. १ फेब्रुवारी २०२६ पासून ग्राहकांना महिन्याला जास्तीत जास्त पाच वेळाच रिवॉर्ड पॉइंट्स रिडीम करता येतील. याआधी अशा प्रकारची कोणतीही मर्यादा नव्हती. त्यामुळे उच्च उत्पन्न गटातील आणि मोठ्या प्रमाणात कार्ड वापरणाऱ्या ग्राहकांनी या बदलाची नोंद घेणे आवश्यक आहे.

**पीएनबी – केवायसी अपडेट नसेल तर व्यवहारांवर निर्बंध**

पंजाब नॅशनल बँकेने आपल्या ग्राहकांना केवायसी (KYC) अपडेट करण्याबाबत अंतिम इशारा दिला आहे. ज्या खात्यांचे केवायसी ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत प्रलंबित होते, त्यांनी २ फेब्रुवारी २०२६ पर्यंत ते पूर्ण करणे बंधनकारक आहे. वेळेत केवायसी अपडेट न केल्यास खात्यातून पैसे काढणे, जमा करणे किंवा डिजिटल व्यवहारांवर मर्यादा येऊ शकतात.

एकंदरीत, १ फेब्रुवारीपासून लागू होणारे हे बँकिंग बदल मध्यमवर्गीयांच्या खिशावर परिणाम करणारे ठरणार आहेत. त्यामुळे ग्राहकांनी आपल्या बँकेचे नवीन नियम वेळेत तपासून आवश्यक ती तयारी करणे, हाच संभाव्य अडचणी टाळण्याचा सुरक्षित मार्ग ठरणार आहे.

# राष्ट्रवादी जे ठरवेल, त्यास भाजपचा पाठिंबा

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नागपूर :** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर त्यांची जागा कोण घेणार यावर चर्चा सुरू असतानाच पक्षाच्या निर्णयाला भाजपचा आणि सरकारचा पाठिंबा असेल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी येथे स्पष्ट केले. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते दोन वेळा मला भेटून गेले. पवार कुटुंबीय आणि राष्ट्रवादी जो निर्णय घेईल त्यास आमचा पाठिंबा असेल, असे ते म्हणाले.

अजित पवार यांच्या निधनानंतर, राष्ट्रवादीचे विधिमंडळ पक्षनेतेपद कुणाकडे जाईल, उपमुख्यमंत्री कोण होईल यावर चर्चा सुरू आहे. राष्ट्रवादी मुख्यमंत्र्यांच्या भेटीगाठी घेत आहेत. यासंदर्भात भाजपची नेमकी भूमिका काय, असा प्रश्न विचारला असता मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, कुठलाही निर्णय घ्यायचा असेल, तो राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष घेईल. त्यांनी घेतलेल्या निर्णयाच्या पाठीशी आम्ही सरकार म्हणून आणि भाजप म्हणून ठामपणे उभे राहू. त्यामुळे मी तूर्त एवढेच सांगू शकतो की, अजितदादांचे कुटुंब असो किंवा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष असो, त्यांच्या पाठीशी आम्ही पूर्णपणे उभे आहोत. त्यांचा जो काही निर्णय होईल, त्यांना योग्य ते समर्थन आमचे असेल. गेल्या काही काळात अजितदादांनी अर्थसंकल्पाची मोठी तयारी केली होती.

उद्यापासून मी स्वतः अर्थसंकल्पाच्या प्रक्रियेवर लक्ष घालून उर्वरित काम पूर्ण करणार आहे. त्यानंतर अर्थसंकल्प कोण मांडणार, याबाबत निर्णय घेतला जाईल, असे मुख्यमंत्री म्हणाले. . सुनेत्रा पवार यांच्यासंदर्भात तुमच्याशी काही चर्चा केली का, असा प्रश्न विचारला असता फडणवीस म्हणाले, माझ्याशी दोन वेळा राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते चर्चा करून गेले आहेत. त्यांच्या पक्षाची कार्यपद्धती काय आहे, कोणते पर्याय आहेत, याबाबत त्यांनी चर्चा केली आहे. मात्र अंतिम निर्णय त्यांचा पक्ष घेईल. त्या संदर्भात यापेक्षा अधिक माझ्याकडे माहिती नाही.

# ज्येष्ठांसाठी रेल्वे प्रवास स्वस्त होणार?

### ज्येष्ठ नागरिकांसाठी तिकिटांवरील जुनी सवलत सुरू

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** देशभरातील लाखो रेल्वे प्रवासी २०२६ च्या आगामी केंद्रीय अर्थसंकल्पाची आतुरतेने वाट पाहत आहेत. नेहमीप्रमाणे सामान्य माणूस अर्थमंत्री निर्मला सीतारमण काही महत्त्वाच्या घोषणा करतील, ज्यामुळे त्यांच्या खिशात दिलासा मिळेल अशी अपेक्षा करत आहे. दरम्यान, ज्येष्ठ नागरिकांसाठी सर्वात मोठी बातमी समोर येत आहे. मीडिया रिपोर्ट्स आणि सूत्रांनुसार, भारतीय रेल्वे कोविड-१९ साथीच्या आधी ज्येष्ठ नागरिकांना मिळालेल्या तिकीट भाड्यावरील सवलत पुन्हा सुरू करण्याचा गांभीर्याने विचार करत आहे. या अर्थसंकल्पात मंजूर झाल्यास, ही ज्येष्ठ प्रवाशांसाठी एक महत्त्वाची भेट असेल. मार्च २०२० पर्यंत, भारतीय रेल्वेने




आपल्या ज्येष्ठ प्रवाशांची विशेष काळजी घेतली होती, परंतु कोविड-१९ साथीच्या काळात ती स्थगित करण्यात आली होती. आता, ही सुविधा पुन्हा सुरू करण्याबाबत अर्थ मंत्रालय आणि रेल्वे मंत्रालयामध्ये चर्चा झाल्याचे वृत्त आहे. जर हा प्रस्ताव अर्थसंकल्पात मंजूर झाला, तर ६० वर्षे आणि त्यावरील पुरुष आणि ५८ वर्षे आणि त्यावरील महिला पुन्हा एकदा सवलतीच्या दरात प्रवास करू शकतील. ही सवलत स्लीपर ते फर्स्ट एसी पर्यंतच्या सर्व वर्गांना लागू होऊ शकते, ज्यामुळे लांब पल्ल्याचा प्रवास करणाऱ्या ज्येष्ठांना लक्षणीय आर्थिक मदत होईल.

## झटपट निर्णयाची राष्ट्रवादीला घाई?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या खासदार सुनेत्रा पवार या राज्याच्या पहिल्या उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेणार, हे आता स्पष्ट झाले आहे.

अजित पवारांना जाऊन दोन दिवस झाले नाहीत तर राष्ट्रवादीच्या नेत्यांनी नेता निवडीचा घेतलेला निर्णय पाहता एवढी घाई का? असा प्रश्न विचारला जात आहे; पण ज्या जलदगतीने हा निर्णय घेण्यात आला, ते पाहता राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या नेत्यांनी शरद पवार गटाला पुढील हालचाली करायला संधी दिलेली नाही. दोन्ही राष्ट्रवादींच्या विलीनीकरणाची चर्चा महापालिका निवडणुकीआधीपासून सुरू आहे.

# इस्लाम पार्टीला भाजप-काँग्रेसचे बळ

### शिवसेनेला रोखण्यासाठी मालेगावात अनोखी आघाडी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मालेगाव :** महापौरपदाच्या महापालिका निवडणुकीत शिवसेनेला रोखण्यासाठी भाजप आणि काँग्रेसने एक गट स्थापन झाला असून, भारतीय विकास आघाडी या नावाने महसूल आयुक्तांकडे नोंदणी झाली आहे. या गटाच्या अध्यक्षपदी काँग्रेसचे एजाज बेग यांची निवड करण्यात आली आहे. या राजकीय घडामोडीमुळे काँग्रेस व भाजप राज्यात पहिल्यांदाच एकत्र आले असून, हा गट महापौरपदासाठी इस्लाम पार्टीला पाठिंबा देणार असल्याचे चित्र आहे. महापालिकेत इस्लाम पार्टीने ३५, तर समाजवादी पार्टीने पाच जागा जिंकल्या आहेत.

सत्ता स्थापनेसाठी ४३ हा बहुमताचा आकडा गाठवा लागणार आहे. काँग्रेसचे तीन सदस्य मिळून





सभागृहात ४३ सदस्यांचे संख्याबळ पुरे होते. मात्र, गट स्थापनेसाठी किमान पाच सदस्यांची आवश्यकता असते. मालेगाव इस्लाम पार्टी व समाजवादी पार्टीच्या गटनेत्यांची निवड झाली होती. मात्र, काँग्रेसच्या गटनेते निवड थांबली होती. भाजपच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनी वरिष्ठ पातळीवर चर्चा करून काँग्रेससोबत गट स्थापन केला आहे. भाजप काँग्रेसच्या गटनेतेपदी एजाज बेग यांची निवड करण्यात आली आहे, तर उपगटनेतेपदी मदन गायकवाड यांची निवड झाली आहे. भाजप-काँग्रेस युतीमुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. शिक्षणमंत्री दादा भुसे व शिवसेना शिंदे गटाला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी ही रणनीती आखण्यात आली आहे.

# सर्व शाळांत विद्यार्थिनींना मोफत सॅनिटरी पॅड पुरवा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** खासगी आणि सरकारी शाळांमधील विद्यार्थिनींना मासिक पाळीचे सॅनिटरी पॅड मोफत उपलब्ध करून द्यावेत, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना दिले. मासिक पाळीच्या आरोग्याचा अधिकार हा संविधानात नमूद केलेल्या जगण्याच्या मूलभूत अधिकाराचा एक भाग आहे, असे न्यायालयाने नमूद केले. जर खासगी शाळा या सुविधा पुरवण्यात



अयशस्वी ठरल्या, तर त्यांची मान्यता रद्द केली जाईल, असेही न्यायालयाने म्हटले. न्यायमूर्ती जे. बी. पारडीवाला आणि न्यायमूर्ती आर. महादेवन यांच्या खंडपीठाने राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना सर्व शाळांमध्ये विद्यार्थिनी आणि विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र शौचालये असल्याची खात्री करण्याचे निर्देश

# सेमी फायनलच्या शर्यतीत पाकिस्तानला मोठा धक्का

### १९ वर्षांखालील वर्ल्ड कपमध्ये रनरेट ठरणार निर्णायक; भारताची आघाडी भक्कम

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** १९ वर्षांखालील क्रिकेट वर्ल्ड कपमध्ये रविवारी भारत आणि पाकिस्तान यांच्यात रंगणारा सामना केवळ पारंपरिक प्रतिस्पर्ध्यांतील लढत नसून सेमी फायनलचे तिकीट ठरवणारा निर्णायक सामना ठरणार आहे. मात्र या सामन्यापूर्वीच पाकिस्तानला मोठा धक्का बसला असून, केवळ भारतावर विजय मिळवून सेमी फायनलमध्ये प्रवेश मिळवणार नाही, हे आता स्पष्ट झाले आहे.



सुपर सिक्स फेरीत भारत आणि पाकिस्तान हे दोन्ही संघ आमनेसामने येत आहेत. या सामन्यातील विजयी संघाला सेमी फायनलची संधी मिळणार आहे, असे चित्र सुरुवातीला वाटत होते. मात्र आता गुणतालिका आणि नेट रनरेटचे (NRR) समीकरण पाहता पाकिस्तानसमोर अधिक कठीण आव्हान उभे ठाकले आहे. या वर्ल्ड कपच्या सुपर सिक्स फेरीत भारताने दमदार कामगिरी करत आपले तिन्ही सामने जिंकले आहेत. त्यामुळे भारताचा आत्मविश्वास चांगलाच उंचावलेला आहे. दुसरीकडे पाकिस्तानला इंग्लंडविरुद्ध पराभव पत्करावा लागला, आणि हाच पराभव आता त्यांना सेमी फायनलच्या शर्यतीत महागात पडताना दिसत आहे. सध्या भारताचा नेट रनरेट +3.337 इतका जबरदस्त आहे, तर पाकिस्तानचा नेट रनरेट +1.484 असा आहे.

# बद्रीनाथ-केदारनाथमध्ये मोबाईलला नो एंट्री ?

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**डेहराडून :** बद्रीनाथ-केदारनाथ मंदिर समिती (बीकेटीसी) आगामी चारधाम यात्रा हंगामासाठी भाविकांसाठी अत्यंत कडक नियमावली लागू करण्याच्या तयारीत आहे. यामध्ये मंदिर परिसरात मोबाईल फोन नेण्यास पूर्णपणे बंदी घालणे आणि बिगरहिंदूंना प्रवेश नाकारणे यांसारख्या महत्त्वपूर्ण प्रस्तावांचा समावेश आहे. मंदिराचे पावित्र्य राखणे आणि अलीकडच्या काळात मंदिर परिसरात व्हिडीओग्राफी, रिल्स आणि ब्लॉगिंगचे वाढते पेव रोखणे, हा यामागील मुख्य उद्देश आहे.

## गृह विभागाच्या अपर मुख्य सचिवपदी मनीषा पाटणकर

**मुंबई :** गृह विभागाच्या अपर मुख्य सचिवपदी वरिष्ठ सनदी अधिकारी मनीषा पाटणकर म्हैसकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सामान्य प्रशासन विभागाने शुक्रवारी यासंदर्भातील आदेश जारी केले. राज्य सरकारने शुक्रवारी काही महत्त्वाच्या अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश जारी केले. गृह विभागाचे अपर मुख्य सचिव इक्बालसिंह चहल हे शनिवारी, ३१ जानेवारी रोजी सेवानिवृत्त होत आहेत. त्यांच्या जागी आता मनीषा पाटणकर-म्हैसकर यांना नियुक्ती देण्यात आली आहे, तर मनीषा म्हैसकर यांच्याकडील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अपर मुख्य सचिवपदी मिलिंद म्हैसकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पुढील आदेशापर्यंत महसूल व वन विभागाच्या अपर मुख्य सचिवपदाचा अतिरिक्त कार्यभारही त्यांच्याकडे देण्यात आला आहे. एच. एस. वारकरी यांची महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेच्या संचालकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. नन

# भारतीय राज्यांवर कर्जाचे ओझे वाढतेय

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** भारतीय अर्थव्यवस्था जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थांपैकी एक म्हणून ओळखली जात असली, तरी देशातील अनेक राज्यांवर वाढते कर्ज हे गंभीर आव्हान ठरत आहे. आरबीआय आणि राज्यांच्या अर्थसंकल्पीय आकडेवारीनुसार, काही राज्यांवर इतके कर्ज आहे की त्यांचा महसुलाचा मोठा भाग केवळ व्याज आणि कर्जफेडीसाठी खर्च होतो. याचा थेट परिणाम विकासकामे, सामाजिक योजना आणि दीर्घकालीन आर्थिक स्थैर्यावर होत आहे.

आरबीआयच्या विश्लेषणानुसार, पंजाब, राजस्थान, केरळ आणि पश्चिम बंगाल ही राज्ये देशातील सर्वाधिक कर्जबाजारी राज्यांमध्ये मोडतात. या राज्यांमध्ये कर्जाचे प्रमाण एकूण राज्य उत्पन्नाच्या (GSDP) तुलनेत खूप जास्त आहे. परिणामी, नव्या विकास प्रकल्पांसाठी त्यांच्याकडे मर्यादित आर्थिक मोकळीक उरते.

उत्तर प्रदेश देशातील सर्वाधिक लोकसंख्या असलेले राज्य असल्याने त्याचे एकूण कर्ज मोठे आहे. मात्र, अर्थव्यवस्थेचा आकार मोठा असल्यामुळे कर्ज-उत्पन्न गुणोत्तर तुलनेने नियंत्रणात मानले जाते. तरीही, भविष्यात वाढत्या खर्चांमुळे यूपीवर कर्जाचा दबाव वाढण्याची शक्यता तज्ज्ञ व्यक्त करत आहेत.

महाराष्ट्र देशातील सर्वात मोठ्या अर्थव्यवस्थांपैकी एक असून, एकूण कर्जाच्या बाबतीत ते वरच्या क्रमांकावर असले तरी कर्जाचा भार GSDPच्या तुलनेत मध्यम स्तरावर आहे. औद्योगिक आणि महसुली क्षमता मजबूत असल्याने महाराष्ट्राला तुलनेने दिलासा आहे.

# आता कुठे गेला 'कटेंगे तो बटेंगे' नारा ?

### आ. देशमुख म्हणतात, सत्तेसाठी मुस्लिम नगरसेवकांशी भाजपची हातमिळवणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**अकोला : "कटेंगे तो बटेंगे" या घोषणेखाली विधानसभा निवडणूक लढवणाऱ्या भाजपाचा हा नारा अकोला महानगरपालिकेच्या सत्तास्थापनेवेळी नेमका कुठे गेला, असा थेट आणि गहन प्रश्न उपस्थित करत शिवसेना उपनेते आ. नितीन देशमुख यांनी भाजपच्या राजकारणावर जोरदार हल्लाबोल केला आहे.**



आमदार देशमुख म्हणाले की, विधानसभा निवडणुकीत भाजप उमेदवार विजय अग्रवाल यांनी "कटेंगे तो बटेंगे" असा नारा देत समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला. धार्मिक ध्रुवीकरणाच्या माध्यमातून मते मागितली गेली. मात्र निवडणूक संपल्यानंतर आणि महानगरपालिकेत सत्ता स्थापनेची वेळ येताच त्याच भाजपाला मुस्लिम नगरसेवकांचा पाठिंबा स्वीकारावा लागतो, हा मोठा विरोधाभास आहे. हा दुटप्पीपणा अकोलेकर जनतेने उघडा डोळ्यांनी पाहिला असल्याचे त्यांनी सांगितले. "जर मुस्लिम नगरसेवक सत्ता स्थापनेसाठी योग्य आणि स्वीकारार्ह असतील, तर निवडणुकीदरम्यान समाजात विष पेरणारे, द्वेष निर्माण करणारे नारे देण्याची गरज काय होती?" असा थेट सवाल करत आमदार देशमुख यांनी भाजपाच्या राजकारणावर बोट ठेवले. निवडणुकीपुरते हिंदुत्व आणि सत्तेसाठी तडजोडीचे राजकारण, हाच भाजपाचा खरा चेहरा असल्याचा आरोप त्यांनी केला.

भाजपाचे हिंदुत्व हे तत्वनिष्ठ नसून सत्ताकेंद्रित आहे, असा आरोप करत त्यांनी सांगितले की, जनतेला भावनिक मुद्द्यांवर भडकवून मते मिळवायची आणि सत्तेसाठी मात्र कोणाचाही पाठिंबा घ्यायचा, ही भाजपाची जुनीच पद्धत आहे. अकोला महानगरपालिकेतील सत्तास्थापनेने भाजपाचा हा ढोंगीपणा पुन्हा एकदा समोर आला असून, जनतेने याची दखल घ्यावी, असे आवाहनही आमदार नितीन देशमुख यांनी केले.

### भाजपचा खरा चेहरा उघडा पडला!



भाजप सतत हिंदुत्व, राष्ट्रवाद आणि धर्माच्या नावावर राजकारण करत असली, तरी सत्तेच्या वेळी मात्र हे सर्व मुद्दे बाजूला ठेवून कोणाचाही पाठिंबा घेतला जातो, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले असल्याचे ते म्हणाले. "सत्तेसाठी कुठल्याही पातळीवर जाणे, हेच भाजपाचे खरे धोरण आहे, या सत्तास्थापनेमुळे अकोलेकरांसमोर भाजपाचा खरा चेहरा उघडा पडल्याची टीकाही त्यांनी केली.